शिरस्तेदार.

No. 284

विनायक कोंडदेव ओक.

Approved of by the Dakshina Prize Committee.

THE SHIRASTEDAR.

A TALE

BY

VINAYAK KONDADEO OKE.

Registered under Act XXV of 1867.

1881.

Six Annas.

☞ To be had at the "Vividha Jnana Vistar" Book Depot, Kalba Devi Road, Bombay.

BOMBAY,

PRINTED AT THE NIRNAYA SAGAR PRESS.

दक्षिणा प्रैझ कमिटीनें पसंत केलेलें पुस्तक.

शिरस्तेदार.

हें पुस्तक

विनायक कोंडदेव ओक

ह्यांनीं लिहिलें.

१८८१.

साहा आणें.

☞ To be had at the "Vividha Jnana Vistar" Book Depot, Kalba Devi Road, Bombay.

BOMBAY,

PRINTED AT THE NIRNAYA SAGAR PRESS.

दक्षिणा प्रैझ कमिटीनें पसंत केलेलें पुस्तक.

शिरस्तेदार.

हें पुस्तक

विनायक कोंडदेव ओक

ह्यांनीं लिहिलें.

१८८१.

साहा आणें.

हीं पुस्तकें मुंबईत काळबादेवी रोडवर विविधज्ञान विस्तार पुस्तकालयांत मिळतील.

मुंबई,

'निर्णयसागर' छापखान्यांत छापिलें.

PREFACE.

The "Shirastedar" was portrayed with the object of laying bare the corruption and dishonesty of some of the Shirastedars, Karkuns &c. employed in *Kutcheries* under European gentlemen, and of showing how they abuse what little power they have to the oppression and ruin of the poor people; and also of suggesting to Government some means by which this wholesale system of oppression may be considerably prevented, if not altogether stopped.

This small work was originally submitted in 1872 to the Dakshina Prize Committee for their patronage. The writer feels bound in justice to himself to state that it met with the approval of the Committee who awarded him a prize and recommended to the Director of Public Instruction that it should be published departmentally. For reasons not known to the writer, however, the publication was delayed for a long time. At length at the Author's request, the Director of Public Instruction kindly permitted him to publish it upon his own account.

In speaking of the Shirastedar, the Secretary to the Dakshina Prize Committee observes, that the object of the author has been fairly accomplished. He conjectures, that the class of men of the type of the "Shirastedar" has been probably fast diminishing, owing to the spread of education among the people. Nothing would be more gratifying to the author than to see that this is true. Be that as it may, the publication of such books, the Secretary thinks,

will cause those who may be fortunate enough to obtain responsible positions, to think that the happiness of the people depends largely on their own conduct. If this publication contributes, in however small a degree, towards the accomplishment of the desired end, the writer will feel himself amply rewarded for his labour.

प्रस्तावना.

ही गोष्ट इ० स० १८७२ ह्या वर्षी लिहून मेहेरबान दक्षिणा प्रैझ कमिटीकडे पाठविली. ती त्यांस पसंत पडून त्यांनीं मला थोडेंसें बक्षीस दिलें, आणि ती छापून प्रसिद्ध करण्याविषयीं ठराव केला. तें काम आजपावेतों तसेंच राहिलें. तरी, माझ्या विनंतीवरून मेहेरबान दैरेक्तर अफ पब्लिक इन्स्त्रक्शन साहेब बहादूर ह्यांनीं तें पुस्तक मला परत दिलें, ह्याबद्दल मी त्यांचे फार फार उपकार मानितों.

कमिटीचे चिटणीस वे. शा. सं. रा. रा. रावजी शास्त्री गोडबोले ह्यांनीं एक प्रस्तावना ह्या पुस्तकास जोडिली आहे. तींत त्यांनीं असें लिहिलें आहे कीं, पुस्तक लिहिण्याचा उद्देश "एकंदरीनें पाहातां बराच सिद्धीस गेला आहे".... "आज कित्येक वर्षें विद्येचा प्रसार एकसारखा होत चालला आहे, त्या योगानें ह्या ग्रंथांत वर्णिल्या प्रकारच्या कामगार लोकांची संख्या उत्तरोतर कमी होत चालली असावी." होय. असें झालें असल्यास ही गोष्ट फार संतोषाची आहे. पुढें ते असें ह्मणतात,-"तथापि ह्या ग्रंथांतल्या सारख्या गोष्टी लोकांच्या वाचण्यांत येऊं लागल्या असतां, परमेश्वरसत्तेनें ज्या कोणांस अधिकार प्राप्त होईल, त्यांच्या मनांत आपल्या वर्तनावर लोकांचीं सुखदुःखें फार अवलंबून असतात अशा-विषयीं विचार येऊं लागतील." इतकें झालें तर माझ्या श्रमांचें सार्थक झालें असें मी मानीन.

शिरस्तेदार.

भाग पहिला.

जनहो, मी ह्या जगांतील हरएक गोष्टीविषयीं आतां निराश होऊन, मरणाची मार्गप्रतीक्षा करीत बसलों आहें. मृत्यु येईल केव्हां, आणि तो मला ह्या लाजिरवाण्या जिण्यापासून सोडवील केव्हां, असें मला झालें आहे. मी आत्महत्या करून घेण्यास सुद्धां अगदीं सिद्ध आहें! परंतु, काय दुर्दैव पहा, आत्महत्या करून घेण्याचें देखील साधन मला मिळत नाहीं! मित्रहो, मरणाएवढें भयंकर दुसरें कोणतेंही अरिष्ट नाहीं, व तें केव्हां येईल याचा भरंवसा नाहीं; तें टाळण्याकरितां प्राणिमात्र प्रयत्न करीत असतात. असें अत्यंत द्वेष्य जें मरण, तें देखील मला आतां परमप्रिय वाटत आहे. पण तें सुद्धां ह्या हतभाग्याला प्राप्त होत नाहीं! काय सांगावें! असो. जगन्नियंता ठेवील तसें राहणें भाग आहे. बरें, माझ्या ह्या दुर्दशेबद्दल कोणाला तरी दोष लावण्यास मला तोंड आहे काय? नाहीं बरें; मुळींच नाहीं. मी ही आपली दशा आपल्या हातानें करून घेतली आहे. असो, आतां माझें झालें तें झालें; तें नाहींसें होत नाहीं. तथापि, ज्या मोहपाशांनीं मला ह्या यमयातनांत पाडिलें आहे, त्यांच्या भरीं भरून तुह्मीं कोणीं फसूं नये आणि दुःखसमुद्रांत बुडूं नये, अशी माझी फार इच्छा आहे, ह्मणून मी आपल्या कर्माची काहणी तुह्मांपाशीं गातों. ही लक्षपूर्वक ऐका आणि सावध व्हा, एवढीच विनंती आहे.

आतां तुह्मांला असें वाटेल कीं, आधीं मी आपलें कुलगोत्र, नांवगांव सांगेन, आणि मग पुढच्या गोष्टी क्रमानें कळवीन. परंतु मित्रहो, जळो तें माझें नांव आणि कुलगोत्र ! तें कशाला पाहिजे? त्यावांचून कांहीं अडलें आहे काय ? अहो, "मान सांगावा जनांत आणि अपमान सांगावा मनांत!" मला माझें नांवगांव सांगण्यास कांहींएक लाज वाटत नाहीं. कां कीं, माझें व्हावयाचें तें सगळें होऊन चुकलें आहे. ह्या कारागृहांतून जर मी खचीत जीवंत बाहेर पडत नाहीं, तर लोकांनीं मला कसेंही लेखिलें, ह्मणून त्यापासून माझें काय बरेंवाईट व्हावयाचें आहे? परंतु काय करूं? माझ्या आप्तवर्गांची दया येऊन त्याविषयीं माझ्यानें कांहीं बोलवत नाहीं. पहा, मी मदांध झालों; मीं पैसा खाल्ला; मीं अनन्वित कर्में केलीं; मी परमेश्वरास विसरलों; त्याचें फल मी आतां भोगीत आहें. तें ठीक आहे. पण तें दुसऱ्यांस भोगावें लागावें काय ? पण जनरीति पहा कशी विचित्र आहे ती ! माझ्या ह्या दुर्दशेमुळें माझ्या सगळ्या कुळास कलंक लागला, असें लोक समजतात. चौघांत माझी गोष्ट निघाली ह्मणजे माझ्या आप्तवर्गांस मान खालीं घालावी लागते ! अहो पाप करतो कोण, आणि त्याचें फल भोगावें लागतें कोणाला ? असो. आतां, मी आपलें नांवगांव न कळवितां मला जेव्हांपासून समजूं लागलें, तेव्हांपासून घडलेल्या मुख्य मुख्य गोष्टी सांगावयास आरंभ करितों. इकडे अवधान असावें.

मी जातीचा ब्राह्मण आहें. माझा बाप फार गरीब होता. सराफीच्या व्यापारावर मोठे कष्ट करूनही त्याला अगदीं थोडा पैसा मिळे; तेवढ्यावर तो कुटुंबाचा निर्वाह सरासरी करी. घरांत भाजीभाकरीशिवाय दुसरा पदार्थ कधीं शिजलाच

नाहीं. पागोटें एक; तें एकदां दसऱ्याला बांधलें, ह्मणजे वर्षाची बेगमी; तसाच जुना एक आंगरखा; तो कधीं सणावारीं किंवा लग्नाकार्यांत घालावयाचा; आह्मां मुलांच्या आंगांवर वस्त्र असलें असलें नसलें नसलें; बायकांच्या आंगांस दागिन्याचा विटाळ; दिवस मावळण्यापूर्वीं संध्याकाळचीं जेवणें उरकावयाचीं, ह्मणजे तेल जाळायास नको; मी सरकारी शाळेंत नादार विद्यार्थी होतों; अशी आमची गृहस्थिति होती. आमच्या बाबांस कधीं थोडा अधिक पैसा मिळाला, तरी तो त्यांच्यानें अघळपघळ खरचवत नसे. कांकीं, तो मिळविण्यास त्यांस अतिशयित मेहनत पडे. जो पैसा मिळविण्यास मनुष्यास फार कष्ट करावे लागतात, तो त्याच्यानें सहसा खर्चवत नाहीं; आणि पैसा हातीं येण्यास किती खपावें लागतें हें ज्यांस समजत नसतें, आणि हातपाय न हालवितां ज्यांवर पैशाचा पाऊस पडतो, ते बहुतकरून फार अविचारी आणि उधळे असे निपजतात; असा साधारण नियम आहे. ह्याचीं उदाहरणें शोधण्यास फार लांब जाणें नलगे; प्रथम अति दरिद्री असून ज्यानें स्वकष्टानें सहस्रावधि रुपये कमविले आहेत तो, आणि त्याचेच मुलगे, ह्यांच्या सुखोपभोगांकडे व खर्चीकपणाकडे जरा लक्ष दिलें ह्मणजे पुरे. असो.

विद्याभ्यासाविषयीं माझ्या मागें माझ्या बाबांचा फार लकडा असे. तेणेंकरून मला लवकरच लिहितां वाचतां व हिशेब करतां येऊं लागलें. पुढें मला सोळावें वर्ष लागलें. तेव्हां बाबांनीं मला मुलकी परीक्षेच्या तयारीस लाविलें. बाकी विषय मला बरेच कळत; पण जमाखर्चांत माझी बुद्धि अगदीं चालेना. ही गोष्ट मी बाबांस सांगितली.

तेव्हां त्यांनीं मला सांगितलें कीं, "तुझ्यानें होईल तितकें तूं कर; कांहीं कमी पडलें, तर दप्तरदार आहे तो आपल्या बगंभटाचा यजमान आहे, त्याजकडून कांहीं संधान लावूं; शिवाय शें पन्नास पडले तरी पाहूं; पण यंदां परीक्षा हाणली पाहिजे." तेव्हां मला धीर आला, आणि तयारी करून मी परीक्षेस गेलों. तेथें पाहूं लागलों, तों जमाखर्चाचें जें प्रकरण मला चांगलें अवगत होतें, तेंच विचारिलें; त्याचीं उत्तरें मीं बरोबर दिलीं, आणि माझी परीक्षा उतरली. ह्या कामांत बाबांना भीड खर्चावी लागली नाहीं, व कांहीं खर्चही पडला नाहीं.

ह्याप्रमाणें परीक्षा उतरल्यावर नौकरी मिळवाय्याच्या उद्योगास मी लागलों. मीं आपली सर्व हकीकत लिहून कलेक्तर साहेबांकडे असा अर्ज केला कीं, "अमुक मामलेदार कचेरींत पंधरा रुपयांची व अमुक हुजूरकचेरींत दाहा रुपयांची, अशा दोन जागा खालीं आहेत, त्यांतली एक मला मिळावी." असा प्रथम अर्ज करून महिना झाला, तरी कांहीं जबाब आला नाहीं. तेव्हां बाबा जाऊन चिटणिसांस भेटले. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, "ठीक आहे; मुलाकडून दुसरा एक अर्ज करवा; मी होईल तितकें साह्य करीन." त्याप्रमाणें मीं पुनः अर्ज पाठविला. पण जी पहिल्याची वाट तीच दुसऱ्याची वाट. जबाब नाहीं. तेव्हां बाबांस अतिशयित वाईट वाटून, ते पुनः एकदां चिटणिसांकडे गेले. तेव्हां ते कांहीं कामांत होते. तरी त्यांनीं बाबांस असें सांगितलें कीं, "मी आतां जरा गुंतलों आहें; संध्याकाळीं या; मी घरांत असलों तर बरेंच झालें; नाहींतर तुमच्या कामाचा निकाल ह्या गिरिधरलालजींस कळवून

ठेवीन; त्यांस भेटा म्हणजे झालें." आमचे बाबा फार भोळे होते. त्यांना ह्या बोलण्याचा कावा समजला नाहीं. ते संध्याकाळीं चिटणिसांच्या येथें गेले. तों चिटणिसांची स्वारी बाहेर गेली होती; आणि गिरिधरलालजी ओटीच्या चहुथऱ्यावर बसलेहोते. त्यांस बाबांनीं 'जयगोपाळ' केल्याबरोबर ते उठून उभे राहिले, आणि त्यांनीं बाबांस हात धरून एकीकडे नेलें, आणि कानाशीं लागून हळूच म्हटलें, " अहो, औषधाशिवाय कधीं कोणाला गुण आला आहे काय? देव देखील नवसाखेरीज पावत नाहीं. आपण तर बोलून चालून संसारी माणसें! थोडीबहुत तजवीज करा, म्हणजे तुमचें काम उद्यां फत्ते! उगाच रिकाम्या खेपा घालून काय होणार?" हें ऐकून बाबांनीं विचारिलें, " बरें, भूक तरी केवढीशी आहे?" त्याचें उत्तर तोंडीं न देतां, लालजींनीं आमच्या बाबांस एक बोट उभें करून दाखविलें. आम्ही फार गरीब आहों इत्यादि अनेक नम्रतेच्या गोष्टी बाबांनीं त्यांस सांगितल्या. त्यावर लालजींनीं खडखडीत असें उत्तर दिलें कीं, " उगाच मुळमूळ नको! मामलेदार कचेरींतील पंधरांची जागा पाहिजे असेल, तर साठ पडतील; आणि हुजूरची दाहांची लागत असेल, तर दीडशें लागतील; एक पै कमी होणार नाहीं. कोणतें पतकरतें तें सांगा, आणि त्याप्रमाणें आणून मोजा, म्हणजे नेमणुकीचा हुकूम तयार. उगाच रिकामें डोकें उठवूं नका. अहो, तुम्हांला सांगितलें तर खोटें वाटेल. ह्या हुजूरच्या जागेकरितां आत्मारामपंत दोनशें घेऊन हात जोडून उभा आहे. पण तुमचा आमचा पूर्वींपासून घरोबा, परका विचार नाहीं, म्हणून दीडशें! हं; उमजा लवकर कायतें. म्हणजे त्याप्रमाणें रावसाहेबांला.

सांगायाला बरें." बाबानीं असें मनांत आणिलें कीं, हुजूरच्या जागेला खर्च फार पडतो खरा; परंतु ती मिळाली ह्मणजे मुलाला आजच घर सोडायास नको, हें एक; आणि मुलगा हुशारीनें साहेबांसमोर काम करूं लागला ह्मणजे ते त्याला सहज बढतीची जागा देत जातील, आणि आपलें कल्याण होईल. ह्याप्रमाणें विचार करून सायंकाळीं बाबांनीं दीडशें रुपये नेऊन शेटजींच्या पदरीं घातलें. आणि हें झालेलें सर्व वर्तमान मला सांगितलें.

नंतर दुसरे दिवशीं दाहा वाजतां मला कलेक्तर साहेबांच्या कचेरींतून बोलावणें आलें. मी तेथें गेलों. चिटणिसांनीं मला साहेबांपुढें उभें केलें. आणि त्यांस सांगितलें कीं, "हुजूरच्या रिकाम्या जागेवर नेमण्यास हा मनुष्य योग्य आहे; ह्याची परीक्षा उतरली आहे; ह्याचें अक्षर उत्तम आहे; ह्याची बुद्धि चांगली आहे; आणि ह्याच्या चांगल्या वर्तणुकीविषयीं तर खुद्द आमची खातरी आहे. आणखी एकदोन अर्जदार ही जागा मागत आहेत. परंतु त्यांपैकीं एकाला दिसतें कमी, आणि दुसरा कांहीं प्रकरणांत 'सेशन कमिट' झाला होता. ह्या उमेदवारास असा कांहीं अयब नाहीं. ह्या उपर साहेबांची मर्जी." हें ऐकून साहेबांनीं ह्मटलें, "बरें, ह्याला नेमणुकीचा हुकूम द्या." हे शब्द कांनीं पडतांच, हुकूम लिहून अगदीं तयार करून ठेविला होता, तो साहेबांच्या मेजावर आला; त्याजवर साहेबांची सही झाली; आणि तो मला मिळाला. तो घेऊन मी फर्स्त असिस्तंत कलेक्तर साहेबांच्या कचेरींत जाऊन कामावर रुजू झालों. अशा प्रकारें मी कारकून बनलों.

मला कारकुनीची जागा मिळण्यास वर सांगितलेले दी-

डशें रुपये पुरले, असें समजूं नका. त्या रकमेनें चिटणिसाचा मात्र अंतरात्मा तृप्त झाला. परंतु हुजूर नौकरी मिळाल्याबद्दल मेजवानी देण्यासाठीं आमच्या कचेरींतल्या शिरस्तेदारांनीं व इतर कारकूनमंडळीनीं माझें अगदीं डोकें उठविलें. तेव्हां मला एक मोठी टोलेजंग मेजवानी द्यावी लागली. तिला सुमारें साठ रुपये लागले; आणि त्या दिवशीं रात्रीं गाण्याकरितां वीस रुपये खर्चावे लागले ते वेगळेच. ह्याविषयीं माझ्या बाबांस फार वाईट वाटलें. पण त्याची मला तिळभर देखील फिकीर वाटली नाहीं. कारण, आतां थोडे दिवसांत आपण शिरस्तेदार होऊं, आणि ह्या सगळ्या खर्चाचें एकदम उट्टें काढूं, अशी मला मोठी उमेद आली होती.

आमच्या कचेरींत सगळें काम मराठींत चालत असे. साहेबांच्या हाताखालीं आह्मी एकंदर तीन असामी होतों. एक शिरस्तेदार, त्याला दरमहां तीस रुपये; एक पहिला कारकून, तो वीस रुपयांचा; आणि तिसरा मी, मला दुसरा कारकून हा हुद्दा असून दाहा रुपये मिळत. आमचे साहेब मोठे वस्ताद असत. आपल्या हाताखालचा शिरस्तेदार लांच खातो हें ते समजत, आणि त्याविषयीं ते आपणांकडून पुष्कळ जपत. परंतु शिरस्तेदार असे पक्के असत कीं, इकडे गोळ्यांचे गोळे खाऊन, साहेबांपाशीं निस्पृहतेचा बाणा दाखविण्यास तयार. शिरस्तेदार पैसे खाई तें आह्मांस माहित नसे असें नाहीं; तें आह्मांला सगळें कळत असे. आणि त्याविषयीं फार वाईट वाटे. पण, हें वाईट वाटे कशासाठीं? लोक बुडत आणि अन्याय होत ह्मणून नव्हे; तर जसा त्याला पैसा मिळतो तसा आपणांस मिळत नाहीं ह्मणून; दुसरें कांहीं नाहीं. साहेबांची आणि आमची कधीं कधीं

एकीकडे गांठ पडत असे, तरी त्यांपाशीं शिरस्तेदाराविषयीं आमच्यानें एक अक्षर बोलवत नसे. कां कीं, आह्मी चुगली करितों असें जर शिरस्तेदाराला कळलें, तर साहेबांस सांगून आह्मांस एखाद्या मामलेदाराच्या हाताखालीं बारनिशी घांसावयास केव्हां घालील ह्याचा नेम नाहीं, अशी आमची पुरी खातरी होती. शिरस्तेदार अजारी असला, आणि पहिला कारकून कांहीं दुसऱ्या कामांत गुंतला असला, तर मला शिरस्तेदारीचें काम करावयास सांपडे. तेव्हां एकाददुसरा जरा भानगडीचा कज्जा असला, ह्मणजे, त्यांतून माझा वर्षसहा महिन्यांचा पगार निघे. पण असे प्रसंग फार थोडे येत. कारण, भानगडीचीं प्रकरणें कोणतीं आहेत, आणि तीं कधीं निघावयाचीं, हें शिरस्तेदाराला ठाऊक असे. ह्यास्तव, अशा संधीस जरी त्याला थोडा अशक्तपणा वाटला, तरी आपली पिशवी सशक्त करण्याकरितां तो हटकून कचेरीला येत असे.

पावसाळ्यांत स्वाऱ्या जिल्ह्याच्या ठिकाणीं असत. त्या चार महिन्यांत आह्मांस पगारांतले पैसे खर्चून सर्व पदार्थ विकत घ्यावे लागत. पगारांतला एक पैसा देखील शिलक राहात नसे. पहिली तारीख येईल केव्हां आणि आह्मांला पगार मिळेल केव्हां, असें होई. पण अक्तोबर महिन्यांत स्वाऱ्या एकदां बाहेर पडल्या, ह्मणजे मग आह्मी राजे! त्या आठ महिन्यांत आह्मांला पगाराची आठवण देखील होत नसे. एकाद्या खेड्यांत जाऊन उतरलों कीं, पाटील कुळकरणी आलेच बिऱ्हाडीं! मग काय विचारतां? आह्मी हुजूरची मंडळी! गवत आहे; दाणा आहे; चारा आहे; भाज्या आहेत; दूध आहे; दहीं आहे; ऊंस आहेत; आंबे आहेत; फणस आहेत; सारांश, जें पाहिजे तें तयार!

कोणत्याही गोष्टीची वाण नाहीं. फार तर काय, आमच्या एका शिरस्तेदार साहेबांस दर गांवास कोणी तरी एक नवी पर लागे, ती देखील मिळण्यास कधीं अडचण पडली नाहीं! बरें, इतक्यास पैसा मुळींच लागत नसे. हें सगळें पाटील कुळकरण्यांनीं मिळवून आणून द्यावें; आह्मीं त्याचा यथेच्छ उपभोग घ्यावा; आणि पैसा मागाहून देऊं अशा गप्पा हाणून दुसऱ्या गांवास निघून जावें. त्यांतही कोणी फारच हट्टास आला, तर रुपयाच्या ठिकाणीं चार आणे आंगावर टाकून त्यास हांकून लावावें, असा पाठ असे. ह्याच्या योगानें पाटीलकुळकरण्यांस पांचपंचवीस रुपयांची छक्कड बसे. तरी ते असें समजत कीं, ह्या हुजूरच्या मंडळीच्या पायांखालीं आपणांस वर्षांतून शंभर वेळां जावें लागतें, आणि आपलीं शेंकडों कामें त्यांच्या हातीं असतात; ह्यास्तव एकदां मर्जी संपादलेली असली, ह्मणजे कोणत्याही गोष्टीची अडचण पडावयाची नाहीं. आणि तें खरें असतें. गांवांतून हरहमेष तंटेबखेडे होतात. त्यांत कोणत्या तरी एका पक्षाकडे पाटीलकुळकरण्यांचा ओढा असतो. तें प्रकरण मामलेदाराकडून पुढें हुजूर आलें ह्मणजे पाटीलकुळकरणी त्याच्या मागोमाग येतात; शिरस्तेदारास भेटतात; मागची ओळख काढितात; तितकें कारण पडल्यास थोडाबहुत हात दाबितात; शिरस्तेदार, साहेबांस खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें भासवून, पाटलाचें काम करून देतात; त्यांत पाटील आपली पिशवी भरून घेतात; तेव्हां स्वारीखर्चाची व हातदाबणीची वगैरे सगळी कसर निघून जाते. असा ते आंवळा घालून कोंहळा काढितात. मग ते ह्या क्षुल्लक खर्चाची परवा कशाला करतील?

ह्या प्रकारें आमच्या स्वारीच्या खर्चाची तजवीज आंतलेआंत होत असे. कांहीं काळानें त्याविषयींचा बोभाट सरकारच्या कानावर गेला. तेव्हां सरकारानें असा सक्त ठराव केला कीं, जे लोक स्वारींत फिरतात, त्यांनीं घेतलेल्या मालाचे पैसे चुकवून दिल्याबद्दल पावत्या घेतल्या पाहिजेत. ह्मणून आह्मीं कांहीं कमी केलें काय? छि: ! नांव सोडा! सरकार शेर तर आह्मी सव्वा शेर! ठराव आल्याबरोबर आह्मीं पावत्या घेण्याचा पाठ घातला. बरें, त्या तरी पावत्या तपशीलवार का? छि: ! त्या पावत्यांत तारीखमहिन्याच्या आंकड्याखेरीज दुसरा आंकडा असेल तर शपथ ! "आपण आह्मांपासून जो माल घेतला, त्याबद्दलचे सर्व दाम आह्मी घेऊन भरून पावलों. आपणांकडे आमचें कोणत्याही संबंधाचें येणें राहिलें नाहीं," हा त्या पावत्यांचा नमुना! ह्यावरून, काय माल घेतला आणि किती दाम दिले, हें सरकाराला किंवा सरकाराच्या बापाला तरी कळेल काय? बरें, अशी पावती वाणी न देऊन करतो काय? त्याचे देव पाटीलकुळकरणी ! पाटीलकुळकरण्यांचे देव मामलेदार!! आणि मामलेदारांचे देव आह्मी हुजूरचे लोक !!! ह्मणजे आह्मी त्याच्या देवाच्या देवाचे देव !!!! तेव्हां, त्यानें आह्मांशीं तेवढी बात सांगून राहावें कोठें ?

अशा प्रकारें खेड्यांत मौज मारतां मारतां आमच्या स्वाऱ्या तालुक्याचे ठिकाणीं जात. तेथला मामलेदार लांचखाऊ आणि लटपट्या असला ह्मणजे आमचें फार पिकें. कारण कीं, आपले मागें लफडीं काय काय आहेत हें त्याला ठाऊक असे; आणि ज्या ज्या मानानें हीं लफडीं अधिक, त्या त्या मानानें तो आह्मांस अधिकाधिक भीत असे. त्याला

पक्कें ठाऊक असे कीं, कसाही प्रसंग आला, तरी आपणाला जर हुजूरच्या मंडळीचा चांगला वशीला आहे, तर सरकाराच्यानें माझें कांहींएक व्हावयाचें नाहीं. आणि तें खरें होतें. वास्तविक पाहिलें असतां आह्मी आमच्या साहेबाचे डोळे होतों. आह्मी जी वस्तु जशी त्याला दाखवूं, ती तशी त्याला दिसे. आणि अर्थात्, त्याप्रमाणें न्याय किंवा अन्याय कायतो होई. मामलेदार असा असला ह्मणजे आमची दिवाळी! दररोज इच्छाभोजन! तांगे! घोडे! गाड्या! रात्रीच्या वेळीं करमणुकीकरितां 'करि अरजि-मरजि', किंवा निदान 'दौलतजादा' तर असावयाचाच!

मामलेदार निस्पृह आणि खरमरीत असला ह्मणजे त्याच्या ठाण्याच्या जागीं आह्मांला फुकट अशी भाजीसुद्धां मिळत नसे. मग मेजवानीचें नांव कशाला पाहिजे! अशा तालुक्यांत आह्मांला फार जपून वागावें लागे. कारण, स्वारीचे लोक रयतेवर जुलूम करितात, हें त्यास माहीत असल्यामुळें आह्मांवर त्याची सक्त नजर असे. त्याला आह्मी साहेबापेक्षां देखील अधिक भीत असूं. कारण, साहेब मोठे अंमलदार असले, तरी ते परके; त्यांस आंतल्या खांचाखोंचा कळावयाच्या नाहींत; तेव्हां त्यांच्या समोर जें कांहीं पुराव्यानें शाबीद होईल, तेवढ्याविषयीं मात्र कायती भीति; परंतु मामलेदार ह्मणजे आपली हमजात; त्याच्या नजरेपुढें कांहींएक दडावयाचें नाहीं; आणि, आपली करांगुली जर त्याच्या हातीं लागली, तर तो मानेस हात घालून खालीं पाडून दुर्दशा करावयास सोडावयाचा नाहीं, ह्याविषयीं आह्मांस तिळभर देखील संशय नसे.

मीं आमच्या कचेरींत दोन शिरस्तेदारांच्या कारकीर्दी

पाहिल्या. त्या दोनही दोन प्रकारच्या होत्या. पहिला जो शिरस्तेदार होता, तो अतिशयित द्रव्यलोभी असे. त्याला पैसा ह्मटला ह्मणजे प्राणापेक्षां सुद्धां अधिक वाटे. त्याला पगार सगळा तीस रुपये होता. परंतु, सुमारें आठ वर्षांत तो पंचवीस हजार रुपयांचा धनी झाला. तो पैसा खाई पुष्कळ; पण फार बातांबेतानें राही. ह्मणजे, जो पैसा मिळे, तो रोख गुप्त पेढीवर ठेवी; बायकामुलांच्या आंगावर डागडागिना फारसा घालीत नसे; वस्त्रपात्र फार उंच घेत नसे; खाणेंपिणें इतर साधारण लोकांप्रमाणें नेमस्त ठेवी; आणि सर्वांशीं गरीबीनें गोड बोले; तेणेंकरून तो फारसा कोणाच्या डोळ्यांवर आला नाहीं. सांप्रत काळीं लांच खाण्याच्या दोन रीति लोकांत चालू आहेत, एक लोहचुंबकी, आणि दुसरी बगळी. लोहचुंबकी रीतीचे भक्त फार भयंकर होत; ह्मणजे, ते संपादनमार्गाकडे मुळींच लक्ष न देतां, विचार न करितां, परिणाम न पाहतां, जें कांहीं सांपडेल तें गट्ट करितात. 'वादी शंभर देत आहे, तूं काय देतोस बोल,' किंवा, "प्रतिवादी दीडशें घेऊन उभा आहे, तुझें कायतें सांग," असा कारभार त्यांजकडे नित्य चालत असतो. ते कधीं कधीं उभयपक्षांकडीलही पैसे घेतात, आणि त्यांपैकीं एकाच्या वतीनें खटला फैसल झाला ह्मणजे दुसऱ्यास हाका मारायास लावितात. तेव्हां तें कर्म अर्थात् फुटतें आणि लोकांस कळतें. शिवाय, असे अविचारी असतात, ते आपल्या खऱ्या योग्यतेपेक्षां दसपट अधिक डौल करितात. तेणेंकरून त्यांस पुष्कळ शत्रु उत्पन्न होतात. दुसरी रीति बगळी; तिचें अवलंबन करणारे कांहीं धूर्त असतात, ते फैसल्याचा विलंब करीत नाहींत. तर, दोनही पक्ष-

कारांस त्यांस अनुकूल अशीं ते अभिवचनें देतात; आपण साधु-वृत्ति आहों असें साहेबांस दाखवितात; कोणीकडेही ओढा न ठेवितां, खटल्याचा निकाल होईल तसा होऊं देतात; आणि, ज्याच्या बतीनें फैसला होतो, त्याजकडून जें स्वसंतोषानें मिळेल तें घेतात; आणि डामडौल न करितां नेमस्तपणानें राहतात. मीं वर सांगितलेले आमचे शिरस्तेदार कांहींसे ह्या प्रकारचे होते.

हे पहिले शिरस्तेदार जरी असे बगळ्या रीतीचे होते, तरी कांहीं दिवसांनंतर त्यांजविषयीं बभ्रा झाला. परंतु त्या संधीस पेनशनाची त्यांची मुदत भरली; तेव्हां त्यांनीं तितक्यांत उमजून पेनशन घेतलें. त्यांचे मागून दुसरे शिरस्तेदार आले, ते लोहचुंबकी वृत्तीचे असून फार मूर्ख होते, व त्यांस कटिशूळाची व्यथा अतिशयित असे. ते पैसा पुष्कळ मिळवीत; पण त्यांजपाशीं एक कवडी देखील शिलक राहत नसे. त्यांचा सगळा पैसा विषयाच्या भरीस जाई. त्यांस कर्जहीं पुष्कळ झालें होतें. त्यांना दोन बायका सुस्वरूप होत्या; आणखी नेहमी ठेविलेलें एक पगारी आंगवस्त्र असे; शिवाय, अडप झडप नवीनबाळ लागे ती वेगळीच. विषयाचें पूर्ण सुख उपभोगावयास मद्यपान हें उत्तम साधन आहे, असा लोकांचा समज आहे; त्याप्रमाणें आमचे शिरस्तेदार साहेब त्याही व्यसनांत पडले ! मग काय विचारावें ! जनहो, लोकांचें केवळ द्रव्यच घेऊन हे स्वस्थ राहिले नाहींत; तर खटल्यांत सांपडलेल्या गरीब गोजिरवाण्या स्त्रियांचें पातिव्रत्य देखील त्यांनीं त्यांजपासून छिनावून घेतलें! आमचे मुख्य जे शिरस्तेदार ते असे; तेव्हां आह्मी त्यांचे कारकून, त्यांचे शिपायी, आणि ब्राह्मण, हे सर्व त्यांसारखे बनलों!

आह्मांला परमेश्वराचें स्मरण वर्षानुवर्ष होत नसे ! मग नीति आणि अनीति ह्यांचा विचार करितो कोण?

ह्या शिरस्तेदारांच्या अर्ध्या कारकीर्दीच्या सुमारास आमच्या कचेरींतील पहिला कारकून महामारीच्या उपद्रवानें एकाएकीं मरण पावला. तेव्हां त्याची विसांची जागा मला मिळाली. तेणेंकरून शिरस्तेदारांचें आणि माझें निकट सांनिध्य झालें. "बैल गाभणा तर नववा महिना" असा मी वागें, तेणेंकरून ते मजवर अत्यंत लोभ करीत असत. पुढें पुढें तर त्यांचा सगळा अंतस्थ कारभार माझ्या द्वारें चाले. त्यांस फूल तर मला फुलाची पांकळी, असा लाभ होत असे. पैसा खाण्याची व रांडबाजीची चटक मला ह्यांच्याच वेळीं लागली. तिजबरोबर मद्यपानही मजमध्यें शिरलें. जनहो, मी खचीत सांगतों कीं, संगतीनें मनुष्याचें काय होईल ह्याचा नेम नाहीं. मी प्रथम चाकरीवर लागलों, तेव्हां मला द्रव्यलोभ पुष्कळ होता. तरी बाहेरख्याली आणि उधळेपणा ह्यांचा इतका तिटकारा असे कीं, वेश्या ह्मटल्याबरोबर माझें मस्तक चढे, आणि एक पै देखील खर्चीयास माझ्या जिवावर येई. पण वर्षसाहा महिन्यांच्या सहवासानें माझी वृत्ति अगदीं बदलून गेली. प्रथम शिरस्तेदारांबरोबर मी गाण्यास जाऊं लागलों. तेव्हां मी असें ह्मणें कीं, गाणें ही वस्तु अत्यंत मनोरंजक आहे; ती वेश्येपाशीं असली, ह्मणून तिचा स्वीकार करण्यास ती अपात्र होते कीं काय ? हिरा उकिरड्यांत पडलेला असला, ह्मणून त्याची योग्यता कमी मानावी काय ? असें कांहीं दिवस चालल्यावर मला गाण्याचा नाद इतका लागला कीं, कोठें गाणें असलें, ह्मणजे तेथें गेल्याशिवाय मला चैन पडत नसे. बरें, अशा

प्रकारच्या स्त्रियांपाशीं नुसतें गाणेंच असतें काय ? नाहीं. तर गातांना त्या जे नानाप्रकारचे उत्तम उत्तम हावभाव करितात, ते अत्यंत चित्तवेधक असतात. ते पाहून भुलणार नाहीं, असा पुरुष दुनयेंत सांपडणें कठीण. ते हावभाव त्या करितात, तेव्हां त्या आपल्या शरीराचे मोहक अवयव अशा खुबीदार रीतीनें दाखवितात कीं, ते दृष्टीस पडल्यावर मनुष्य कितीही शुचिर्भूत वृत्तीचा असला, तरी त्याची लुटपुट झाल्याखेरीज राहात नाहीं! ती लुटपुट कोणाला सांगून कळावयाची नाहीं. ती केवळ अनुभवानें मात्र समजते. वीस वर्षांचें वय; केतकीच्या गाभ्यासारखें गोरेपण; मुखादि अवयवांची ठेवण सुरेख; लोण्याप्रमाणें मृदु शरीर;—तें वस्त्रालंकारांनीं परिपूर्ण; उठणें बसणें ऐटदार; भाषण नम्र आणि गोड; मधुर गान; इत्यादि गुणांनीं युक्त अशी स्त्री द्रव्यसाध्य असतां, जो द्रव्यवान् तिला भुलून पिशवीचें तोंड मोकळें करण्यास तयार होणार नाहीं, तो प्रतिशुक म्हटला पाहिजे.

माझ्या व्यसनास गाणें ऐकण्यापासून आरंभ झाला; कान तृप्त होऊं लागले, हें पाहून नेत्रांस हेवा उत्पन्न झाला; नेत्रांनीं मनास मोहांत पाडिलें; आणि मनानें सर्व अवयवांस इच्छासुख देण्याचें काम आरंभिलें. अशा प्रकारें मी मोठा चैनी आणि शोकी गडी बनून गेलों. विषयाधीन अशा ज्या लोकांचा मी पूर्वीं उपहास करीत असें, ते मला मागच्या ओळखी देऊन माझी निंदा करूं लागले. माझ्या एका जीवलग मित्रानें ह्याविषयीं एका पत्रांत माझा विनोद केला होता; त्यास मी जें उत्तर लिहिलें, तें मला आतां शब्दशः आठवत आहे. तें असें.—" मी पूर्वीं आपला उपहास करीत होतों, त्याबद्दल मला फार वाईट वाटतें. त्याची आपण

मला क्षमा करावी. ज्याचा नाद मला हल्लीं लागला आहे, तें वाईट असून परिणामीं त्यापासून नाश होईल, हें माझें मन देखील मला सांगतें. परंतु काय करावें? उपाय चालत नाहीं. जगांत राहून हा मोहपाश टाळणें बहुतकरून अमानुष आहे, असें वाटतें. कोणी ह्मणतात, कामदमन करील तो खरा शूर. पण तें अशक्य आहे. जे कोणी इषकबाजीस नांवें ठेवितात, अथवा ती मुळींच करीत नाहींत, त्यांस तिची खरी रुचि माहीत नसते, ह्मणून त्यांचीं मनें तिला पराङ्मुख असतात. ह्या व्यवसायांत एक प्रकारचें सुख अगदीं अप्रतिम आहे, हें अनुभवांतीं आपणां उभयतांसही विदित आहे. आणि ह्याच्या योगानें शेवटीं दुःखही अप्रतिमच भोगावें लागणार आहे, हें खचीत. पण, चिंच तोंडाशीं आली तरी मी आपले तोंडास पाणी सुटूं देणार नाहीं, असें कोणी मनुष्य ह्मणेल तर त्याचें चालेल काय? अथवा, विस्तवाजवळ लोणी ठेवल्यावर, तें वितळायास राहील काय? आपणांस हा पाश सोडून देण्यास अरण्यांत जाऊन राहिलें पाहिजे. तें आपल्याच्यानें होत नाहीं, आणि आपण ह्यांतून निघत नाहीं. ह्यांतच काय होईल तें होईल. तूर्त चाललें आहे तें बरेंच आहे." असो.

ह्या वेळीं मी जरी शिरस्तेदार नव्हतों, तरी मला कांहीं कमी नसे. प्रातःकाळीं आठ वाजतां उठावें; नऊ वाजत तोंपर्यंत शौचमुखमार्जन आटपून, त्या दिवसाचीं जीं गिऱ्हाइकें हातांत गठड्या घेऊन तयार असतील, त्यांच्या गांठी घ्याव्या; त्यांशीं कानगोष्टी करून वसूलबाकी करून टाकावी; दहा वाजतां स्नान करावें; आणि अकरा वाजतां कचेरीस जाऊन कामास लागावें. तेथें खऱ्या खोट्या

गोष्टी सुनावून, आपणांस ज्या कलावर खटला न्यावयाचा असेल, त्या कलाचा भरपूर पुरावा साहेबांस दाखवून आपलें कार्य साधावें; खिसे भरून घरीं यावें; इतक्यांत साडेचार वाजत; तेव्हां कसल्या तरी उंची लाडवांचा फराळ करावा; नंतर पुनः गरजू लोकांस दर्शनें द्यावीं; त्यांनीं आणलेले भेटीचे पदार्थ घ्यावे; उद्यां काय काय पापें कशीं कशीं करावयाचीं तीं ठरवून ठेवावीं; इष्टमित्रांच्या भेटीस जावें; तिकडून येऊन जेवावें, तों रात्रीचे अकरा वाजत. त्यानंतर छामछूम! त्यापुढें धामधूम!! आणि त्या उपरांत निजणें!!! ह्मणजे इतक्या कृत्यास बारावर दोन वाजत. हा आमचा नित्यक्रम. अशीं सुमारें दोन वर्षें लोटल्यावर, आमच्या शिरस्तेदार साहेबांस आमच्या साहेबांच्या शिफारशीवरून दुसऱ्या जिल्ह्यांत चिटणीशीची जागा मिळाली. ते तिकडे गेले. तेव्हां अर्थात् त्यांचे जागेवर माझी नेमणूक झाली. अशा प्रकारें मी एकदां शिरस्तेदारी पावलों. तेव्हां मी कृतकृत्य झालों असें मला वाटलें.

शिरस्तेदारी कशी गाजवावी आणि साहेबांची मेहेरबानी कशी संपादावी, ही विद्या मी आपल्या मागें सांगितलेल्या शिरस्तेदार गुरूजींपाशीं उत्तम रीतीनें पढलों होतों. तेणेंकरून तें काम चालविण्यास व स्वहित साधून घेण्यास मला तिळभर देखील अडचण पडली नाहीं. हें काम मिळण्यापूर्वीं मला नांवापुढें नुसतें 'राव' जोडून हाक मारीत असत. परंतु, शिरस्तेदार झाल्याबरोबर मी 'रावसाहेब' बनलों. मला पूर्वीं, ह्मणजे कारकून असतां, पांचचार कोस पायीं जाण्यास कांहीं वाटत नसे; पण ही दिवाणगिरी मिळतांच दोन पावलें कचेरीस जाण्यास सुद्धां मला घोड्यांची गाडी लागू

लागली. पूर्वी भातभाकर वरण चाले; पण मग तूपसाखरेशिवाय घांस जाईना. साधीं धोतरें नेसावयास आवडेनात, ह्मणून नागपुरी रेशमी धोतरजोडे फाडूं लागलों. कोणी नमस्कार केला तर हात उचलेना. शब्द तोळामासा विकूं लागला. असा मी एक वेगळा चमत्कारिक प्राणी बनून राहिलों. खरोखर, पैशाच्या योगानें मनुष्याच्या स्वभावांत हा एवढा जो फरक होतो, तो अत्यंत उपहासास्पद होय. परंतु, तो बहुतकरून कोणालाही चुकवितां येत नाहीं. जसें दीप आणि प्रकाश हे एकमेकांपासून कधीं वेगळे व्हावयाचे नाहींत, तसा धन आणि मदांधपणा ह्यांचा कांहीं अशीं संबंध आहे, असें एका चतुर कवीनें ह्मटलें आहे. अफूचें सेवन केल्यावर तिचा अंमल न येऊं देणें, हें मनुष्यास दुष्कर नव्हे काय?

भाग दुसरा.

ह्या शिरस्तेदारीच्या कामांत बहुतकरून प्रत्येक प्रकरणीं पैसा मिळतो. पण त्यांमध्येंही खिसे भरण्याचीं मुख्य कामें दोन; एक, पाटील कुळकरण्यांच्या नेमणुका, आणि दुसरें, फौजदारी मुकदमे. पाटील कुळकरण्यांच्या नेमणुकीविषयीं गोंधळ पडूं नये, ह्मणून सरकारानें पुष्कळ नियम केले आहेत. तरी त्यांतही अंमलदार लोकांच्या नजरेवर पुष्कळ असतें. वास्तविक पाहिलें असतां, आतां पाटील कुळकरण्यांच्या उत्पन्नांत कांहीं राहिलें नाहीं. तथापि, त्या अधिकारांवर लोकांची निष्ठा मनस्वी आहे. पाटीलकीचें वर्षाचें उत्पन्न पन्नास रुपयांचें जरी नसलें, तरी त्या वतना-

साठीं हजारों रुपये खरचिल्याचीं उदाहरणें शेंकडों दृष्टीस पडतात. होळीची पोळी, पोळ्याचा बैल, शमिपूजन, इत्यादि मानांपासून जरी कांहींएक उत्पन्न होत नाहीं, तरी त्यांवरून देखील मोठमोठ्या मारामाऱ्या होऊन खटले येतात. लोकांचा समज काय असेल तो असो. पण हीं भांडणें मूर्खपणाचीं आहेत, असें विचारी मनुष्यांस वाटतें; व सरकाराचेंही मत बहुतकरून तसेंच आहे, असें दिसतें. अशा प्रकारचे खटले आले, ह्मणजे त्यांत कोणता तरी एक पक्ष अंमळसा सधन असतो. त्याजकडून आह्मां शिरस्तेदार लोकांचें पोट भरतें.

मी शिरस्तेदारीचें काम करूं लागल्यावर, सुमारें तीन महिन्यांनीं पोळ्याचे बैलावरून मारामारी झाल्याचा एक खटला आमच्या कचेरींत आला. त्यांतले वादी प्रतिवादी हे दोघेही चांगले गबर होते. वादी प्रथम माझ्या बिऱ्हाडीं आला, आणि त्यानें आपली सर्व हकीकत मला सांगितली. तिजवरून, त्याजकडे कांहीं दोष नाहीं असें माझ्या मनांत आलें; पण मी त्याला कायद्याची भलतीच थाप देऊन असें सुचविलें कीं, 'हें प्रकरण तुह्मांला फार भयंकर आहे. संभाळा.' हें ऐकतांच तो घाबरून उठून गेला, आणि सुमारें अर्ध्या तासानें मला एकांतीं गांठून, त्यानें मजपुढें सुमारें चाळीस रुपयांचें एक पैठणी पागोटें ठेविलें; आणि हात जोडून ह्मणाला, "ही उगाच फुलाची पांकळी आहे. माझा बचाव करून हेतु सिद्धीस न्यावा, ह्मणजे आणखी यथाशक्ति सेवा करीन." मीं त्याला आश्वासन देऊन तें पागोटें ठेविलें, आणि मी कचेरीस गेलों. तेथें तो खटला चालला तेव्हां माझे पाय वादीकडे ओढूं लागले, असें पाहून

प्रतिवादी घाबरला. आणि त्याला तेव्हांच असें समजून आलें कीं, शिरस्तेदारास आपलेंसें केल्याशिवाय आपणास यश यावयाचें नाहीं. तेव्हां, कालहरणार्थ त्यानें आणखी पुरावा आणण्याचें निमित्त काढून मुदत मागितली. ती आमच्या साहेबांनीं दिली, आणि त्या खटल्याच्या चौकशीची तारीख पुढें नेमिली. दुसरे दिवशीं तो प्रतिवादी मला येऊन भेटला. त्यानें आपली हकीकत सांगितली. आणि दुसरे दिवशीं, नको नको ह्मणत असतां, एक मोठी ह्मैस, दरवेळेस चार चार शेर दूध देणारी, अशी त्यानें माझ्या गोठ्यांत आणून बांधिली; आणि मी पांच चार मंडळींत बसलों होतों, तेथें ह्मशीबद्दल साठ रुपये रोख घेऊन भरून पावल्याची पावती, दोन साक्षी घालून, तिकीट लावून, स्वदस्तूर सही करून आणून दिली. ती वाचल्याबरोबर तिचा आशय माझ्या लक्षांत आला. ती पावती इतर मंडळीनीं वाचिली; ह्मैस पाहिली; ती पुष्कळ वाखाणिली. नंतर आह्मी सर्व उठून आपापल्या कामास गेलों.

पुढें कांहीं दिवसांनीं ती नेमलेली तारीख आली, आणि तो खटला निघाला. उभयपक्षांचे साक्षीदार झाले. वादी मनांत समजे कीं, मीं दिलेलें पागोटें रावसाहेबांच्या डोक्यास आहे, तेव्हां आपला विसर त्यांस पडावयाचा नाहीं. प्रतिवादी आपले मनांत ह्मणे कीं, हें पागोटें पोंचल्यावर मीं ह्मैस दिली आहे; तेव्हां अर्थात् तिचें कांहीं विशेष सार्थक होईल. असा उभयतांचा विचार चालला असतां, किमतीच्या महत्वानुरूप आमचें मन प्रतिवादीकडे वळून तत्पक्षीं पुरावा बळकट दिसूं लागला, आणि वादीचें मान फिक्कें पडत चाललें. तें पाहून, वादीनें आह्मांस ऐकायास येण्यापुरतें

हळूच ह्मटलें, " रावसाहेब, पागोट्याकडे कांहीं नजर असूं द्या." त्यावर, मीं कांहींएक उत्तर दिलें नाहीं, आणि तें ऐकिलें कीं न ऐकिलें अशावारी नेलें. परंतु, प्रतिवादी जवळच होता, त्याच्या कानीं ते वादीचे शब्द पडतांच त्यानें असें ह्मटलें कीं, " पागोटें अडकलें ह्मशीच्या शिं-गांत !" हें सर्व ऐकून मी उगाच वांकड्या नजरेनें हळूच वादीच्या तोंडाकडे पाहिलें, तों तो निराश होऊन काळा ठिकर झालेला माझ्या दृष्टीस पडला. असो. पुढें काम चाललें. साहेबांनीं विचार केला, आणि प्रतिवादी तर्फे फैस-ला सांगितला. आतां मी खचीत सांगतों कीं, वादीचा पक्ष खरा होता. परंतु त्याला हाणून पाडण्याचा जेव्हां माझा निश्चय झाला, तेव्हां मी तत्पक्षी साक्षीदारांस अशी तंबी दिली कीं, तिच्या योगानें ते त्या प्रकरणांत अगदीं मुके झाले, ह्मणजे, साहेबांसमोर येतांच त्यांनीं सर्व गोष्टींविषयीं कानांवर हात ठेविले, आणि आह्मांस कांहींएक माहीत नाहीं ह्मणून सांगितलें.

हा लांच तर परभारा होता. आतां, साहेबांसमक्ष लांच खाल्याचें एक उदाहरण सांगतों: एका खटल्यामध्यें एकाचे बारा हजार रुपयांचे दागिने होते. ते त्याला परत मिळावयाचे होते. पण त्याविषयीं त्यास खातरी नव्हती. ह्मास्तव त्यानें मला त्यांतल्या चोवीस तोळ्यांच्या सोन्याच्या पाटल्या देऊं करून, दागिने मागण्याचा अर्ज गुदरला. त्या-प्रमाणें ते त्यास द्यावयाकरितां बाहेर काढून साहेबांच्या मेजावर ठेविले, आणि मालकास हाक मारिली. तो आला. त्याचे पदरांत दागिने टाकिते वेळीं, साहेब पाहात असतां, मीं त्या पाटल्या उचलून आपल्या खिशांत

घातल्या. साहेबांनीं मला विचारिलें कीं, " पाटल्या आपल्या खिशांत घालण्याचें कारण काय?" मीं उत्तर दिलें कीं, " त्याची पावती अद्याप झाली नाहीं. सर्व नग त्याला दिले तर तो तावडतोब निघून जाईल, आणि दागिन्यांची सर्व जोखीम आपणांवर राहील. ह्यास्तव, हें हातचें काम आटपल्यावर मी त्यास ह्या पाटल्या देईन, आणि त्यापासून, साखसुरत, तिकीट लावून पावती घेईन. नंतर तो मालक सर्व दागिने पोंचल्याबद्दल साहेबांस येऊन सांगेल." हा जबाब साहेबांस कायदेशीर वाटला, आणि ते कांहीं बोलले नाहींत. काम आटपल्यावर मीं त्याजपासून सर्व दागिने पोंचल्याची तपशीलवार पावती घेतली, ती साहेबांस दाखविली, आणि त्यांजसमोर त्या मालकाकडून सर्व दागिने पोंचले असें वदविलें. नवीन कायद्याप्रमाणें लांच देणार आणि लांच घेणार ह्या दोघांसही शिक्षा व्हावयाची. ह्मणजे, लांच देणारानें प्रथम आपणास तुरुंगांत घालून घ्यावें, आणि मग आह्मांस तुरुंगांत घालण्याचा प्रयत्न करावा. दुसऱ्यास अपशकुन करण्याकरितां आपलें नाक कापून घेईल, असा मूर्ख कोण आहे?

लांचाविषयीं सरकारानें असा कायदा करायाचा नव्हता, असें पुष्कळ लोकांस वाटतें. कारण, तेणेंकरून लांचखाऊ लोकांस अधिक उत्तेजन आलें आणि गरीब रयत बुडत चालली, असें त्यांचें मत आहे; तें खरें आहे. पण अशा लोकांस आह्मी असें विचारितों कीं, सरकारानें तरी करावें काय? खटल्यामध्यें फैसला आपल्या वतीनें झाला नाहीं, ह्मणजे न्यायाधीशानें लांच खाल्ला आणि असा निकाल केला, अशी तक्रार प्रत्येक पराजित पक्षकार कर-

रणार आहे. न्यायाधीशानें निष्पक्षपातानें न्याय केला असला, तरी देखील त्याजवर अशा फिर्यादी होण्याचा संभव आहे. ह्मणजे, फौजदारी किंवा दिवाणी जितके दावे सरकारांत येतील, तितक्या लांचाच्या फिर्यादी होणार! बरें, तें पडद्यांतलें काम; तेव्हां त्याजविषयीं पुरावा होण्याची मारामार; शेंकडा पांचचार खटल्यांत पुरावा मिळाला तर फार! अशा प्रकारचे न्याय निवडण्यास सरकाराला एक थोरलें खातें ठेवावें लागेल; आणि त्यापासून निष्पन्न कांहीं देखील व्हावयाचें नाहीं. आणखी लांच खाण्याचा प्रचार त्याच्या योगानें कमी होईल असें नाहीं. तेव्हां, सरकारानें जो हा कायदा केला आहे, तो ठीक आहे असें दिसतें. त्याला आणखी दुसरें एक बलवत्तर कारण आहे, तें असें. अहो, लांच खाणें हें पाप आहे ह्याविषयीं तर संशय नाहीं; त्याप्रमाणें, एकाद्यास लांच देऊन लोभाच्या लालचीनें अन्याय करायास लावणें, ह्मणजे, जो हेतु मनांत धरून राजानें न्यायाधीशास नेमिलें आहे, तो मोडण्याविषयीं त्यास प्रवृत्त करणें, हा मोठा अपराध होय. मला वाटतें, लांच खाणाऱ्यांपेक्षां लांच देणारे हे अधिक अपराधी आहेत; ह्यास्तव त्यांस लांच खाणाऱ्यांपेक्षां अधिक शिक्षा ठरविली पाहिजे. कारण, द्रव्यलोभ हा मनुष्याच्या आंगचा एक प्रबल दुर्गुण आहे; त्याचें दमन, साधु ह्मणविणाऱ्यांस देखील दुष्कर होतें, तें सामान्य प्रतीच्या संसारी मनुष्यास कधींही सुकर व्हावयाचें नाहीं, हें उघड आहे. ह्मणजे असें झालें कीं, लांच खाणाराचा द्रव्यलोभ जो निद्रित होता, तो लांच देणारानें नजराणा पुढें करून जागृत केला, आणि त्यास पाशांत पाडिलें! असो.

शिरस्तेदार लोक लांच खातात, ही गोष्ट बहुत गोऱ्या अंमलदारांच्या मनांत भरलेली असते, ह्मणून ते त्यांजवर विश्वास ठेवीत नाहींत. सगळें लहान मोठें काम ते स्वतः पाहातात. त्यांतलेच आमचे साहेब होते. ते महा संशयी असत. जबानी घेतांना जरा पक्षकाराकडे पाहिलें कीं त्यांस अंदेशा येई. ते लोकांस असें दाखवीत कीं, मी कोणाचें कांहीं न ऐकतां सगळें काम स्वतः करितों. तरी, ह्याविषयींचे त्यांचे सर्व श्रम बहुतकरून फुकट जात. कारण, लहान मोठीं अनेक कामें व्हावयाचीं असत, तीं सर्व लक्षपूर्वक पाहण्यास त्यांस वेळ होत नसे, व देशभाषेचें ज्ञान सरासरी असल्यामुळें कांहीं उरकत नसे. आह्मी शिरस्तेदार लोक स्वारीस गेलों ह्मणजे मामलेदार वगैरे लोकांपासून मेजवान्या खातों, त्या आह्मांस खातां येऊं नयेत, ह्मणून आमचे साहेब आपलें मुक्काम तालुक्यांच्या गांवांपासून दूर एकाद्या झाडींत करीत, आणि आह्मांसही तेथेंच जवळ देवळांत किंवा धर्मशाळेंत राहावयास सांगत. तेव्हां आह्मांस तसें करणें भाग पडे. परंतु साहेबांचा हेतु एक दिवस देखील सिद्धीस गेला नाहीं! इतकेंच केवळ नव्हे, तर आह्मी तालुक्याच्या गांवीं उतरून जो त्रास मामलेदारांस सोसावा लागला असता, त्याच्या दसपट त्रास सोसून त्यांस आमची बडदास्त अरण्यांत ठेवावी लागे. ह्मणजे, आमची तालुक्याच्या ठिकाणीं जशी चैन चालावयाची, तशी रानांत चाले. जशी काय ऐषआरामानें आमची पाठ घेतली होती! कोठेंही गेलों तरी तो आह्मांस सोडीना!! मामलेदार इतके त्रास सोसून अरण्यांत देखील आह्मांस पाहिजे तें पुरवितात, हें साहेबांच्या लक्षांत कधींही

आलें नाहीं. शिरस्तेदार वगैरे लोकांस आपण ठाण्याच्या जागीं जाऊं दिलें नाहीं, तेव्हां त्यांस मेजवान्या वगैरे कांहीं-एक मिळणार नाहीं, आणि लोकांस त्रास होणार नाहीं, असें खचीत समजून आमचे साहेब मनांत मांडे खात असत!

मी शिरस्तेदार झाल्यावर रिक्तहस्त असा मला कधीं कोणी येऊन भेटला नाहीं. तेणेंकरून माझें घर हरएक पदार्थांच्या राशींनीं भरलेलें असे. मी जरा तोंड हालविलें पुरे, कीं जें पाहिजे तें तयार! बारीक बारीक गोष्टी मी सांगत बसत नाहीं. मी स्वारीमध्यें आपलें आंगवस्त्र फिरवीत असें, तिचा देखील शब्द कधीं खालीं पडला नाहीं! कामें करून देण्याचें माझे हातीं असे खरें; परंतु मोठमोठीं मिळकतीचीं व महत्वाचीं सर्व प्रकरणें तिच्या इच्छेप्रमाणें उलगडत असत. पहा! इंग्रज सरकारच्या राज्यामध्यें, एका कचेरींत, मोठमोठीं कामें अशा प्रकारच्या स्त्रीच्या सूत्रानें व्हावीं, हें मोठें चमत्कारिक नव्हे काय?

मी एका मोठ्या माजिस्त्रेत साहेबांचा शिरस्तेदार, ह्मणून मला पोलिसांतले लोक फार भीत असत. कारण, त्यांजकडून जे खटले आमचे कचेरीस चौकशीकरितां येत, त्यांतल्या त्यांच्या चुक्या संभाळून घेणें हें माझ्या हातीं होतें, हें ते जाणून होते. ह्या आमच्या परस्पर संबंधाचीं जितकीं उदाहरणें घडलीं आहेत, तितक्या सर्वांचें मला स्मरण नाहीं; आणि जीं आठवत आहेत, तीं लिहिण्यास येथें सवड नाहीं. ह्मणून मासल्याकरितां त्यांतली एक गोष्ट सांगतों, ह्मणजे पुरे असें वाटतें. पहा, एके वर्षीं आमची स्वारी फिरतां फिरतां एका तालुक्याच्या गांवीं आली. तेथें आमची सर्व प्रकारची बरदास्त यथास्थित चालली होती. कांहीं कमी

नव्हतें. अशा चैनीमध्यें असतां, एके दिवशीं सायंकाळच्या पांच वाजण्याच्या सुमारास कचेरींतून येतांना, तरुण, गोरी, सुस्वरूप, भिडस्थ, आणि कपाळीं कुंकूं नाहीं, अशी एक स्त्री माझ्या दृष्टीस पडली. ती कोण काय ह्याची मी चौकशी केली. तेव्हां ती एका सभ्य गृहस्थाची कन्या, गतभर्तृका, सकेशा, अट्टल उनाड, परंतु, पाहिजे त्यास सहज प्राप्त न होणारी, अशी ऐटबाज आहे, असें मला कळलें. तिला योग्य द्वारें मीं निरोप पाठविला; परंतु, तिनें आपल्या ऐटीप्रमाणें जबाब देऊन, आमची ताकास तूर लागूं दिली नाहीं. मग काय विचारावें ? आधींच कामानें आंगाचा कल्पांत झाला होता; आणि त्यांत गर्वाचें तेल पडलें ! हिची ऐट जिरवीन, तरच ह्या शिरस्तेदारीचें सार्थक्य, अशा प्रकारें माझ्या मनानें निश्चय केला. दुसरे दिवशीं प्रहर साहा घटिका रात्र होतांच मी आपल्या एक दोन जीवलग मित्रांसहवर्तमान तिच्या येथें गेलों. दारावर थाप मारतांच तिनें दार उघडिलें. परंतु, आह्मांला पाहतांक्षणीं तिच्या आंगाचा असा कांहीं संताप झाला कीं, त्याचें वर्णन देखील करवत नाहीं. तिनें जो शिव्यांचा भडिमार चालविला, त्यानें सर्व दिशा दणाणून गेल्या. त्या ऐकून आमचेंही पित्त खवळलें. आणि शिवाय, त्र्हिाडाहून निघतांना रोजच्या पाठाप्रमाणें एक बाटली ठांसली होती ! मग काय विचारितां ! काम होताच ! शिव्यांनीं क्रोध उत्पन्न केला ! पैसा पुष्कळ मिळे आणि अंमल चाले तेव्हां मदास काय कमी ! आणखी त्यांत बाटलाबाईचें अवसान ! ! ह्यांनीं जी आमची एकदम उचल केली, तिच्या धुंदींत त्या स्त्रीच्या आंगावर धांवून जाऊन, तिला लाथाबुक्यांनीं खूब नरम

करून, असें कांहीं कर्म आरंभिलें कीं, तें आतां सांगण्यास मला लाज वाटते!!! ही आरडाओरड झाली ती ऐकून आळींतलीं शेंपन्नास माणसें जमलीं. जवळच्या चौकी-वरचे जमादार आपला काळा पोषाक करून हातांत तो काळा सोंटा घेऊन मोठ्या अंमलदारीच्या झोंकानें आले. पण कोण काय अशी चौकशी करितां जेव्हां आह्मी अ-मुक असें त्यांस कोणीं सांगितलें, तेव्हां त्यांची नांगी पडली. त्यांचा अंमलदारपणा गेला. ते आमच्या वतीनें बोलूं लागले. तेव्हां अर्थात्, जवळचे लोकही माझा अपराध नाहीं असें ह्मणूं लागले. शेवटीं चार चौघांनीं तिलाच मूर्ख ठरवून आह्मांला मोठ्या आर्जवानें बिऱ्हाडीं आणिलें!! मित्रहो जन कसें आहे तें पहा!

पोलिसानें गुन्हेगार पकडावे, आणि न्यायाधीशांनीं त्यांचा योग्य इनसाफ करावा, असा आमच्या न्यायी इंग्रज सरकारचा फार हेतु आहे. परंतु तो सिद्धीस जात नाहीं. ह्याचीं मुख्य कारणें दोन, किंवा तीन आहेत. पहिलें हें कीं, मीं स्वतःची जी एक निर्लज्जपणाची गोष्ट वर सांगितली, तींत दर्शविल्याप्रमाणें गुन्हा धरण्याचे कामीं पोलिसाकडून हयगय किंवा लबाडी होते; दुसरें कारण असें कीं, गुन्हा शाबिदीसह पकडल्यावर पोलिसाचे अंमलदार पैसा खाऊन नासाबीद ह्मणून अपराध्यास सोडून देतात; तिसरें असें कीं, लांचाचा वगैरे कांहींएक प्रकार न चालतां खटला न्यायाधी-शांच्या समोर आला, ह्मणजे भाषा व रीतिभाती ह्यांची माही-तगारी कमी असल्यामुळें, त्यांचे हातून चुका होऊन अपराधी ते निरपराधी, आणि निरपराधी ते अपराधी ठरतात. ह्या शेवटीं सांगितलेल्या प्रकारानें एतद्देशीय न्यायाधीशांपुढें अ-

न्याय बहुधा होत नाहींत; साहेबांसमोर फार होतात. आणखी एक अन्याय होण्याचें मोठें कारण ह्मटलें ह्मणजे "पोलिसाची समज" होय. "पोलिसाची समज" ह्मणजे काय, हें एतद्देशीय लोकांस सांगावयाचें प्रयोजन नाहीं. कारण, त्याचा अर्थ शहरच्या लोकांसच काय, पण साधारण खेडेगांवच्या मनुष्यांस देखील माहीत आहे. तथापि, परदेशीय न्यायाधीशांच्या व इतर लोकांच्या माहितीकरितां येथें दोन शब्द अधिक बोलणें आवश्यक आहे. मी खातरीनें असें सांगतों कीं, गुन्हे पकडण्याच्या कामीं ह्या प्रांतांतील लोक फार मारहाण करितात. तिचे सर्व प्रकार मला माहीत नाहींत. तरी, मधलें बोट मणगटास लागे इतकें उलटें मोडणें, इंद्रियास चाप लावणें, झाडाला उलटें टांगून झोंके देणें, मिरच्यांची वगैरे धुरी घालणें, कितीएक दिवस उपाशीं ठेवणें, इत्यादि पर्याय अगदीं साधारण आहेत. अशा दुःसह यमयातनांच्या कचाट्यांत एकादा गरीब, सात्विक, असा निरपराधी मनुष्य सांपडला, ह्मणजे त्याला असें होतें कीं, अशा दुःखसागरांत गचकळ्या खात पडण्यापेक्षां एकदम प्राण जाईल तर बरें. ह्मणून तो पोलीसचे लोक जें जें सांगतात तें तें कबूल करण्यास तयार होतो. ह्याप्रमाणें आरोपित आणि साक्षीदार मारून मुटकून तयार केल्यावर मग शाबिदीला काय कमी! बरें शाबिदी झाली कीं शिक्षा तयारच! अशा रीतीनें आज कितीएक लोक प्राणांस मुकले आहेत; आणि कितीएक कुटुंबें, अपराधी नसतां, धुळीस मिळालीं आहेत!! माझ्या एका मित्रानें ह्या इलाख्यांतल्या एका जिल्ह्यांतली खरोखर घडलेली अशी गोष्ट सांगितली कीं, एका मनुष्यास फांशींची शिक्षा ठरून सरकारांत मंजु-

रीस गेली असतां, ज्या मनुष्याच्या खुनावरून ती शिक्षा ठरली होती तो स्वतः जज्जसाहेबांसमोर हजर झाला !! माझा मित्र प्रामाणिक आहे. त्यास खोटें बोलण्याचें प्रयोजन नव्हतें; वास्तव, त्याच्या बोलण्यावर मी पूर्ण विश्वास ठेवितों. बरें, तो मनुष्य ती शिक्षा अमलांत आल्यावर जर हजर होता, तर सरकार काय करतें! जो मनुष्य फांशीं अडकून प्राणास मुकला असता, त्यास त्यांच्यानें पुनः जीवंत करवतें काय? असो. मरणाची शिक्षा मुळींच नसावी, असा जो कितीएक सुज्ञ आणि विचारी पुरुषांचा अभिप्राय आहे, त्याचें मूळ बीज हेंच असावें असें वाटतें.

मी पैसा पुष्कळ खात असें आणि इतक्या अन्यायाच्या गोष्टी करीत असें, तरी साहेबांपाशीं मी अशा रीतीनें वागें कीं, मी बराच निस्पृह आहें असें त्यांस वाटे, व कारण पडे तेव्हां ते माझी पाहिजे तिकडे शिफारस करीत. एकदा अदालतीकडे एक अंमलदारीची जागा कांहीं दिवस रिकामी झाली होती, ती मला आमच्या साहेबांच्या चिठीनें मिळाली. त्या जागेचा पगार माझ्या जागेच्या पगारापेक्षां अधिक होता असें नाहीं; तरी तिकडच्या कामाची माहिती व्हावी, व सवड सांपडेल तेव्हां त्या खात्यांत शिरावें, असा माझा फार हेतु होता. मी तिकडे सुमारें सत्रा महिने काम केलें. तितक्या काळांत त्या खात्यांतील पुष्कळ गुह्य गोष्टी मला माहीत झाल्या. त्या खात्यांतील शिपायांपासून तों तहत शिरस्तेदारापर्यंत सर्वांवर पैशाचा जसा कांहीं पाऊस पडत असतो! मला सगळ्या गोष्टी तपशीलवार आठवत नाहींत. तथापि, अजमास लक्षांत येण्याकरितां असें सांगतों कीं, कामगिरी बजाविणारा सात रुपये दरमहाचा शिपाई, मामलेदार कचे-

रींतल्या तीस रुपयांच्या तिजोरी कारकुनाची जागा पतकरणार नाहीं! चमत्कार पहा कीं, सात रुपये दरमहाचा मनुष्य, घरीं साहा मनुष्यांचा संसार चालवून, मुलांबाळांचीं लग्नें कार्यें करून, चांगला खाऊन पिऊन, दोन पैसे जवळ रोख राखून, एक घोडें नेहमीं घरीं बाळगितो!! ह्यांत कांहीं नवल नाहीं. ही गोष्ट बहुतेक न्यायसभांच्या शिपायांत आढळून येईल. पहा, प्रतिवादीवर समान बजावणें, साक्षीदार हजर करणें, माल जप्त करणें, जमिनीचें वगैरे लिलांव पुकारणें, इत्यादि मोठमोठीं कामें सरकार त्यांचे हातीं देतें, आणि त्यांच्या संबंधाचे सर्व लोक बहुतकरून संपत्तिमान् असतात, तेव्हां त्या शिपायांस पैसा मिळतो, ह्यांत आश्चर्य तें कोणतें? जप्तीच्या वगैरे तर कामांत पैसे हटकून मिळतात. कितीएक कोर्तांत तर अशा मिळकतीच्या कामगिऱ्या कारकून लोक वांटून वांटून घेतात! हें (नेटीव) न्यायाधीशांस जरी उघड उघड दिसत असतें, आणि त्याचा बंदोबस्त व्हावा अशी जरी त्यांची फार इच्छा असते, तरी त्यांचें कांहीं चालत नाहीं. कांकीं, हें काम मुळीं मिळकतीचें. तें करायास शिपाई पाठवा, किंवा कारकून पाठवा, तो पैसे खाणारच, मग त्यांत लक्ष पुरवून काय उपयोग? हातांत कामगिरी आली, ह्मणजे त्या शिपायास किंवा कारकुनास जसें देवपण चढतें. कारण, पक्षकाराचें नफानुकसान सगळें त्याचे हातीं असतें. ह्मणजे असें समजा कीं, समान काढून, प्रतिवादी दाखवून देण्याकरितां वादी शिपायाबरोबर निघाला, तो प्रतिवादीच्या अगदीं गांवाजवळ आला; इतक्यांत ती बातमी प्रतिवादीस कळली, ह्मणून तो पळून जाण्याची तयारी करूं लागला; अशा संधीस शिपायानें जलदी केली तर

बरें; नाहीं तर तो पळून जाणार, आणि वादीचे श्रम व खर्च हे तूर्त व्यर्थ होणार. अशा वेळीं वादी शिपायाला अधेली पावली सहज देईल किंवा नाहीं ? बरें, घरांत चालत आलेली लक्ष्मी शिपाई बिचारा सात रुपयांचा नौकर तो तरी कशाला नाकारील ? जप्तीच्या कामांत तर ह्या कामदारांस फार पैसा मिळतो. ह्मणजे आधीं दरखास्त काढण्यासच, ऐवजाच्या मानानें रुपया दोन रुपये चेरीमेरीस लागतात. नंतर बजावणाऱ्या अंमलदाराची दक्षिणा ती वेगळीच ! अशा प्रकारें रयत बुडत असते. शिवाय, बिनवारशी अथवा अज्ञान मुलाची जिनगी जप्त करितांना कोर्टाचे लोकांचा जो लाट साधतो तो अगदीं अवर्णनीय आहे ! ह्याविषयीं एक गोष्ट स्वत: मला माहीत आहे,ती मी येथें सांगतों. एका अज्ञान मुलाची जिनगी, तो मोठा होईपर्यंत ताब्यांत ठेवण्याविषयीं एका अंमलदारास कोर्टाचा हुकूम झाला. त्या जिनगीच्या जागीं तो कोर्टाचा अंमलदार गेला, आणि तेथें, पंचांनुमतें, त्याची सर्व जिनगी जप्त करून, आपले ताब्यांत घेऊन ठाण्याचे जागीं आला. मग काय विचारावें ? जप्त केलेल्या जिनगींत खरोखर पांच हजार रुपयांचे काप होते, ते त्यानें काढून घेऊन, त्यांचे जागीं दिसण्यांत त्यांहून अधिक ढबदार असे चारशें रुपयांचे काप करून ठेवून दिले ! असेंच बाळ्यांचें ! असेंच बुगड्यांचें ! असेंच नथांचें ! असेंच जवाहिराचें ! खरे खडे काढून घ्यावे, आणि खोटे ठेवून द्यावे ! जप्त केलेली जिनगी खरोखर सुमारें आठ लक्षांची होती. ती अशा प्रकारें रूपांतर पावून तो मालक मोठा झाल्यावर जेव्हां त्याचे हातीं गेली, तेव्हां सगळी सुमारें दीड लक्षाची होती ! कोणी असें ह्मणेल कीं, त्या वस्तु पं-

चांनीं पाहिल्या होत्या, त्यांत असा फेरबदल करावयास कसा सांपडला ? त्यावर उत्तर असें कीं, त्या वस्तू जरी पंचांनीं पाहिल्या होत्या, तरी, त्यांतील प्रत्येकीवर त्यांनीं निशाणी करून ठेविली होती काय ? नाहीं. त्या घरांतून बाहेर काढण्यापुरते मात्र ते साक्षीदार. पुढें त्यांचें सगळें बरें वाईट कोर्टाच्या कामदारांचे हातीं असतें.

अशा अनेक गोष्टी मला ठाऊक आहेत. त्या येथें सांगण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आतां, असा अन्याय न व्हावा, एतदर्थ तजवीज कोणती योजावी ? ह्याचें उत्तर एवढेंच कीं, कामदार लोक इमानी इतबारी असे पाहून नेमावे, आणि त्यांजवरही सक्त नजर ठेवावी. दुसरा उपाय नाहीं. वास्तविक पाहिलें असतां कोर्टाकडील प्रत्येक काम महत्वाचें आहे; ह्यास्तव, न्यायाधीशानें आपल्या हाताखालच्या लोकांवर भरंवसा ठेवावा, आणि त्यांचे हातून काम घ्यावें, हें आवश्यक आहे; दुसरा इलाज नाहीं. कोर्टाकडील माझी मुदत भरल्यावर मी परत आपल्या जागेवर आलों. तिकडील कथेस आतां पुनः आरंभ करितों.

मी आपले जागेवर पुनः येऊन पाहतों, तों आमचे पहिले साहेब बदलून नवे आले होते. त्यांच्या हाताखालीं काम करून कावेबाजपणानें माझ्या हाताखालच्या पहिल्या कारकुनानें त्यांचा चांगला लोभ संपादिला होता. त्याचें खातेंपोतें नीट जमत आहे, इतक्यांत मी आलों ; तेव्हां मी त्या कारकुनास शत्रूसारखा दिसलों; पण तो करतो काय? चूप बसून काम करणें त्याला भाग पडलें. तरी, तेव्हांपासून त्याच्या मनांत मजविषयीं पडदा आला. त्याला असें वाटूं लागलें कीं, माझ्या पुढें वाढलेलें पान ह्यानें ओढिलें.

पण हें बरोबर होतें काय ? असो. धनलोभाचा महिमा अगाध आहे ! त्याचे मनांत मजविषयीं पाप आलें तें तो आपणाकडून छपवीत असे, पण प्रसंगोपात तें चटकर बाहेर पडे. मनांत एकादी गोष्ट अल्प असते तोंपर्यंत ती दुसऱ्याच्या दृष्टोत्पत्तीस येत नाहीं; परंतु ती फार झाली, ह्मणजे केव्हां ना केव्हां तरी बाहेर येते. कांहीं दिवस मोघम मोघम असतां असतां पुढें त्याची माझी खूपच लागून राहिली. संधी सांपडली ह्मणजे मीं त्याच्या नालस्त्या साहेबांपाशीं सांगाव्या, आणि त्यानें माझ्या सांगाव्या, असें चाललें ! आह्मी दोघेही मूर्ख आणि लबाड आहों, असें साहेबांच्या मनांत वागूं लागलें. ते दोघांवरही विश्वास ठेवीतनासे झाले. परंतु, साहेब लोक हे बहुधा स्वभावानें फार सीधे असतात; त्यांस कोणाविषयीं कांहीं समजलें, तरी एकाद्यावर कायदेशीर रीतीनें फिर्याद झाल्याशिवाय ते त्याची चौकशी करीत नाहींत, व वड्यांचें तेल वांग्यांवर काढीत नाहींत, हें बहुत दिवसांपासून माझ्या अनुभवास आलें होतें; त्याप्रमाणेंच ह्या आमच्या साहेबांची वृत्ति होती. तेणेंकरून, जरी आह्मी दोघे असे बिळ्या भोंपळ्यासारखे वागत होतों, आणि माझा सगळा सपाटा पूर्वीप्रमाणें चालला होता, तरीं आमचें कोणाचें कांहीं झालें नाहीं. असें कितीएक वर्षेंपर्यंत चाललें.

खरोखर, त्या बहारीच्या दिवसांमध्यें आह्मीं पापापुण्याकडे बिलकुल पाहिलें नाहीं ! आपण करतों काय, आणि ह्याचा परिणाम काय, ह्याविषयींचा विचार कधीं मनाला शिवला देखील नाहीं ! त्याचें हें प्राय:श्चित आतां भोगायास सादर असलें पाहिजे ! तोबऱ्याला पुढें आणि लगामाला कां मागें ? असो. ते दिवस आठवले ह्मणजे मनाला दु:ख होतें

खरें; तरी, तें अनुपम सुख आपण पुष्कळ दिवस भोगिलें आहे, असें वाटून अंतःकरण कांहींएक प्रकारचें समाधानही पावतें ! हर हर, समाधान पावतें असें मीं लिहिलें काय ? जीवा, पाप करितांना तुला सुख वाटलें तें वाटलें, आणखी, त्या पापकर्माच्या स्मरणानें तुला समाधान वाटावें काय ? अंतःकरणाच्या पापवृत्तीपुढें कांहीं उपाय नाहीं !

पाप करण्याची कोणाची इच्छा नसते. सुखाच्या आशेनें मनुष्यें पाप करितात. तरी पाप केव्हां ना केव्हां तरी बाहेर पडून त्याचें फळ आपणास भोगावें लागेल, ही गोष्ट ह्मणजे त्यास माहीत नसते असें नाहीं. परंतु, मदाच्या योगानें ती निरंतर लक्षांत राहात नाहीं, आणि पाऊल अमार्गीं पडतें. असें पाऊल एकदा अमार्गीं पडून तिकडची रुचि लागली, ह्मणजे जरी वर सांगितलेली गोष्ट मनांत आली, तरी असें वाटतें कीं, "आतां काय ? एकादी गोष्ट एकदां केली काय आणि सातदां केली काय ? व्हावयाचें तें झालें. मग आतां सध्याचें सुख तरी कां गमवा? पुढें व्हावयाचें तें होईल." अशा अविचारानें मनुष्य घसरत घसरत निकृष्टावस्था पावतो. स्वतः माझी अवस्था अशीच झाली. पाप उघाडीस येऊन त्याबद्दल शिक्षा व्हावी, हा जसा ईश्वरी संकेत दिसतो, तसा तीं पापें बाहेर पडण्यास ही कांहीं योगायोग घडून यावे अशी त्याची कांहीं योजना असावी, असें वाटतें. पहा, वास्तविक ह्मटलें असतां माझ्या जागीं जो आमचा पहिला कारकून काम करीत होता, त्यानें, मी आपले कामावर परत आलों ह्मणून मजवर दांत धरावा काय ? अहो, दिवाणीकडचा रजेवर गेलेला माणूस परत येऊन आपले जागेवर दाखल झाला, ह्मणून मी आपले

कामावर परत आलों, ह्यांत मीं कांहीं मोठें पातक केलें काय? पण तें होणार! त्यापुढें कोणाचा उपाय? त्याची माझी चांगलीच लागून राहिली होती. तेव्हां, त्यानें एका प्रकरणांत चांगली पक्की पाळत ठेवून, लांचाच्या मुद्याचा माल माझे घरांत धरून दिला! तेव्हां चौकशीचे वेळीं मी अगदीं निरुत्तर झालों. माजिस्त्रेतासमोर मजवर सर्व शाबिदी होऊन त्यानें मला सेशन कमिट केलें. तेथें मीं पुष्कळ उपाय करून पाहिले. परंतु पुरावा उघड असल्यामुळें सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. शेवटीं जज्ज साहेबांनीं जेव्हां मला माझी शिक्षा सांगितली, तेव्हां मला सगळें ब्रह्मांड आठवलें! मनुष्य मेलें ह्मणजे जसें त्याचें प्रेत एकटें जातें, तसा मी आपल्या कुटुंबांतून एकटा तुटून जाऊन कारागृहांत पडलों! पहा, जेव्हां शिपायांनीं प्रथम मला धरून आणिलें, तेव्हां माझी बायको आणि तिचीं तीन मुलें धाय मोकलून रडतांना प्रथम माझे दृष्टीस पडलीं. त्या वेळीं मला अतिशयित दुःख झालें. मनोवृत्तीचा काय चमत्कार आहे पहा! मी मोठा हौशी रोजगारी होतों, तेव्हां त्या बापडीकडे मीं नीट पाहिलें देखील नाहीं बरें! मग तिला सुख तें कोठून मिळणार? आणि, कारागृहांत जातांना तिची मला दया आली! आणि खरोखर माझ्या मनानें मला असें बोचिलें कीं, "अरे चांडाळा, तूं ह्या आपल्या धर्मपत्नीची हेळसांड करून अनीतीनें वागलास, त्याचें हें फळ!"

भाग तिसरा.

जनहो, माझ्या कर्मकथेचें हें शेवटचें कडवें मी आतां ह्मणतों. मी ह्या कारागृहांत यमयातना भोगीत आहें. बारा वर्षें एकसारखा रोजगाराच्या भरांत होतों. तितक्या काळांत मला देवाची आठवण स्वप्नांत देखील झाली नाहीं. पण आतां त्याचें स्मरण झाल्यावांचून एक पळही लोटत नाहीं! ठीकच आहे! दुखणें आलें ह्मणजे वैद्याची आठवण! पण, मित्रहो, फार जपा बरें. अन्न न मिळेल तर भिक्षा मागा, परंतु, पापकर्म करून ह्या दुःख समुद्रांत पडूं नका. रुप्याचें ताट राहिलें घरीं; आणि आलें पळसाचें पान! चांदीच्या वाट्या कोठें आहेत? परळाशीं गांठ! पंचपक्कान्नीं भोजन काय झालें? आली ढप्पळ भाकर! मागच्या सुखाची आठवण कशाला पाहिजे? ही चवाळ्याची टोपी! ही नंबराची खादीची बंडी! हा चोळणा! हीं लोखंडाचीं पादभूषणें! दिवसभर मरेमरे तों काम करावें, आणि अशा ह्या पोषाकानें एका चवाळ्यावर रात्रभर पडावें! स्वतंत्रता तर स्वप्नांत देखील दर्शन देत नाहीं! हरहर! खरोखर ह्या स्थितीपेक्षां मरण बरें! अहो, मी नीच कर्मानें मिळविलेला बराच पैसा माझ्या घरीं आहे! माझें आंगवस्त्र, ह्मणजे जें मी आपल्या जीवाहून अधिक मानीत होतों, तें खुशाल चैन करीत आहे, आणि मी असा येथें पडलों आहें! हा मी आपल्या कर्मानें पडलों! आतां आंसवें गाळून काय उपयोग? मना, आतां हा हुंदका आंवर, आणि आपल्या देशबांधवांस आपल्या अनुभवाच्या उपयुक्त अशा दोन गोष्टी सांग!

मित्रहो, मी तुह्मांस शपथपूर्वक असें सांगतों कीं, अ-

न्यायानें द्रव्य संपादण्यांत कांहींएक लाभ नाहीं. त्यापासून शेवटीं दुःख मात्र अतिशय होतें. पहा बरें, मी न्यायान्यायाकडे न पाहतां पुष्कळ पैसा मिळविला, तेव्हां तो मला सुखावह वाटला. आतांचे दुःखाचे दिवस येतील असें माझ्या मनांत देखील कधीं आलें नाहीं. पण पहा काय परिणाम झाला तो! हक्क नसतां लोकांस नाडून त्यांनीं कष्ट करून मिळविलेला पैसा मीं घेतला,हें एक पाप; त्याकरितां खोट्याचें खरें आणि खऱ्याचें खोटें करविलें हें दुसरें पाप; यजमानाशीं निमकहरामपणानें वागलों हें तिसरें पाप; विनाकारण कितीएकांच्या घरांवर आग पाखडिली, हें चवथें; धनांध होऊन लोकांचा अपमान केला आणि बिचाऱ्या कितीएक चांगल्या माउल्यांस पातिव्रत्यच्युत केलें हें पांचवें; अशी पापांची याद वाचूं तरी किती? तीं सगळीं पापें मला आठवायाचीं नाहींत; आणि जीं आठवत आहेत, त्यांची कथा सांगण्यास माझें अवशिष्ट आयुष्य सुद्धां पुरणार नाहीं! बरें, तीं सगळीं सांगून तरी काय करावयाचें आहे? पण मी खरोखर तुह्मांस सांगतों कीं, तीं माझीं सगळीं पापकर्मे आतां माझ्या अंतःकरणास बिंचवांप्रमाणें बिंधीत आहेत! ह्या कारागृहांत मला जें शरीरदुःख भोगावें लागत आहे, त्याच्या लक्षपटीपेक्षांही अधिक वेदना ते बिंचू माझ्या मनाला देत आहेत! पण महाराज, काय करूं? हात पावेना आणि घोडा धांवेना, अशी माझी स्थिति झाली आहे! जळो माझें जिणें! अहो, जो मोळक्या दिवसभर रानांत हिंडून एक मोळीभर लांकडें जमवून संध्याकाळीं चार पैशांचें पीठ घरीं घेऊन जातो, आणि स्वस्थपणें बायकामुलांसहवर्तमान थोडथोडी भाकर खाऊन खुशाल निजतो,

तो हल्लीं मजपेक्षां लक्षपट सुखी आहे, असें मी समजतों !

मित्रहो, इमानेंइतबारें वागून जें मिळेल तें मिळवा आणि त्यावर चरितार्थ चालवा. अन्यायानें पैसा मिळवून त्यापासून उत्पन्न होणारें सुख प्राप्त करून घेण्याच्या भरीस भरूं नका. मला कामावर असतां पुष्कळ पैसा मिळत असे, व अनेक प्रकारचें सुख होई हें खरें; तथापि मी जरा एकांतीं गेलों, अथवा आपल्या स्थितीचा विचार करूं लागलों, ह्मणजे माझा जीव मला खाई. आपण इतकीं पापें केलीं आहेत, त्यांतून कोणतें कोणत्या वेळीं बाहेर येईल आणि माझा घात करील कोण जाणे, असें मला भय वाटे. परंतु, अशा एकांताच्या आणि विचाराच्या वेळा फार थोड्या येत; तेणेंकरून त्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आणखी दुसरें असें आहे कीं, जे कोणी मजसारखे विषयी आणि शतमूर्ख बनतात, त्यांस लज्जा नाहींशी होते असें ह्मणा, किंवा आपणांस कशाचीही परवा नाहीं असें दाखविण्यांत त्यांस कांहीं भूषण वाटतें ह्मणा, पण त्यांची स्थिति अशी बेपर्वाईची होते, ह्यांत संशय नाहीं. मी जेव्हां 'रावसाहेब' असून लांच आणि विषय ह्यांत चूर होतों, तेव्हां माझ्या एका मित्रानें माझी पुष्कळ कानउघडणी केली. पण त्या वेळीं त्याला मीं जें उत्तर दिलें, तें मला अद्यापि आठवत आहे ; मीं ह्मटलें, "तुह्मी ह्मणतां शेवटीं परिणाम फार वाईट होईल, एवढेंच ना ? फार तर मी तुरुंगांत पडेन आणि मला सक्तमजुरीची शिक्षा भोगावी लागेल, इतकेंच कीं नाहीं! अं: ! आमची तयारी आहे ! आह्मी जेव्हां ह्या कामांत शिरलों, तेव्हांच आह्मांकरितां एक खोली तुरुंगांत तयार करून ठेविली आहे, असें आह्मी समजतों !"

हें उत्तर अगदीं अविचाराचें होतें. कारागृहांतलीं दुःखें मला तेव्हां माहीत असतीं, तर मी असें उत्तर खचीत दिलें नसतें. तेव्हां मीं जसा होतों, तसे जे कोणी आतां असतील, त्यांस माझें विनयपूर्वक सांगणें आहे कीं, महाराज, 'फार झालें तर तुरुंगांत पडून सक्तमजुरीची कैद भोगावी लागेल, एवढेंच कीं नाहीं काय तें,' हें ह्मणणें फार सोपें आहे; पण, तें भोगणें परम दुःसह आहे बरें. अहो, अहोरात्र पायांत दाहा शेरांची बेडी; हा चोळणा; ही बंडी; ही टोपी; खायाला दप्पळ भाकर; दिवसभर मरेमरे तों काम; त्यांत जरा चूक झाली कीं फटके तयार; शिपायाच्या परवानगीवांचून लघ्वीस देखील जातां कामास नये; अशी स्थिति येथें प्राप्त होते! ही सोसणें फार कठिण नव्हे काय? विचार करा, विचार करा. उगाच दुर्गुणाच्या भरीं भरूं नका. "सुख पाहतां जवापाडें, दुःख पर्वता एवढें," असें जें तुकारामबुवांनीं ह्मटलें आहे, त्याचा अनुभव मी हल्लीं घेत आहें. माझें हें सांगणें वायफळ नव्हे. थट्टेवर नेऊं नका. मी तुह्मांसारखाच होतों, तो आतां ह्या स्थितीस मिळालों आहें. मजवर विश्वास ठेवून मी सांगतों तें खरें माना. घमंडीच्या गोष्टी करून माझ्या देशबंधूंनीं आपली अशी दुर्दशा करून घेऊं नये, ह्मणून हें मी तुह्मांला फोडून फोडून सांगत आहें. उगाच हंसल्यावारी नेऊं नका.

आणखी सर्व जनांस मी स्वतःच्या अनुभवावरून असें कळवितों कीं, द्रव्यलोभ आणि काम ह्यांची तृप्ति करण्यास जों जों प्रयत्न करावा, तों तों त्याविषयींची तृष्णा अधिकाधिक वाढत जाते. दहा रुपये मिळत असले ह्मणजे बीस पुष्कळ वाटतात; बीस मिळूं लागले ह्मणजे तिसांनीं आपली तृप्तता

होईल असें मनांत येतें; परंतु ही सर्व भ्रांति आहे. इतरांची गोष्ट असो, राजे लोकांचीं उदाहरणें घ्या. पहा, सांप्रत काळीं रुशिआच्या बादशाहाचें राज्य लहान आहे काय? सुमारें अर्धी पृथ्वी त्याची आहे, असें ह्मटलें तरी चिंता नाहीं. तरी तो तृप्त होऊन स्वस्थ बसला आहे काय? एशिआ खंडाच्या मध्यभागीं आणखी राज्य संपादण्याची त्याची सक्त खटपट चाललीच आहे! शिकंदर बादशाह ह्मणून जो महा पराक्रमी भूपति प्राचीन काळीं होऊन गेला, त्यानें बहुतेक सर्व पृथ्वी जिंकीत आणिली असतां, तो एके वेळीं अत्यंत खिन्न होऊन ह्मणाला, "ही सर्व पृथ्वी ताब्यांत आल्यावर मग मी काय जिंकूं?" ह्यावरून द्रव्यलोभाविषयीं मनुष्याची वृत्ति कशी आहे, हें उघड दिसून येईल. त्याप्रमाणेंच कामाचें. जशीं संपत्तीविषयीं उदाहरणें दिलीं, तशीं, किंवा त्यांहूनही अधिक ढळढळीत अशीं विषयाविषयीं अनेक उदाहरणें देऊन त्याची पुष्कळ फोड करितां येईल. परंतु तें प्रकरण फार बीभत्स आहे. त्याविषयीं आपणांसारख्या सज्जनांपाशीं बोलावयास मला शंका वाटते. तथापि मोहगम मी एवढें खचीत सांगतों कीं, त्या प्रकरणांत प्रत्येक व्यक्तीच्या रुचीच्या आणि शरीरसमाधानाच्या विलक्षण भिन्न भिन्न रीतींच्या योगानें एवढा प्रळय होतो. बाकी, मनाच्या समाधानाच्या संबंधानें पाहिलें असतां सर्व सारखें! कोठें कांहीं अंतर नाहीं! हें विशेष स्पष्ट होण्याकरितां मी असें ह्मणतों कीं, कशीबशी थोडीबहुत भाकर मिळून क्षुधेची शांति व्हावी, आणि कसें तरी जाडेंभरडें वस्त्र मिळून लज्जेचें रक्षण व शीतोष्णाचें निवारण व्हावें, एवढाच हेतु जर मनुष्यांच्या ठायीं असता, तर निर्वाहापुरतें

द्रव्य मिळविण्याविषयीं कोणास इतका त्रास पडला नसता, व दरोडे वगैरे मोठाले अनर्थ घडतेना. परंतु भाकरीनें पोट भरूं लागलें, ह्मणजे त्याला पोळी हवीशी वाटते; पोळी हातीं आली, ह्मणजे लाडवांची इच्छा; लाडू झाले, ह्मणजे इतर पक्कान्नांवर वासना! मुख्य हेतु ह्मटला, तर क्षुधाशांति. पण त्या शांतीच्या रीतींचे हे चोंचले! त्याप्रमाणेंच विषयाचें. स्त्रीसंभोग ह्याचें पर्यवसान कामशांति आहे. त्यामध्यें स्त्रीचें तारुण्य, सौंदर्य, शरीरमार्दव, हावभाव, ऐट, ह्या गोष्टींच्या वैचित्र्यानें मनुष्य नादीं लागतो, पाशांत पडतो, आणि शेवटीं नाश पावतो! ह्या गोष्टीचा अनुभव मीं स्वतः घेतला आहे. ह्या जगामध्यें पुरुषास स्त्रीसारखा मोहक पदार्थ दुसरा नाहीं. आणि त्यावांचून त्याचें चालत नाहीं, हेंही खरें आहे. तथापि, निर्वाहापुरता मात्र त्याशीं संबंध ठेवावा, आणि तरुण, सुस्वरूप, आणि चंचलबुद्धि अशा स्त्रियांपासून होईल तितकें दूर राहावें, हा उत्तम पक्ष आहे? अशा परस्त्रियांशीं आपलें संघटन बिलकुल होऊं नये, असा कितीएकांचा स्वभाव प्रथमतः असतो; परंतु, मग मंडळीच्या सहवासानें त्यांस असें वाटतें कीं, बैठकींत नुसतें गाणें ऐकायास काय चिंता आहे? बरें, गाण्याला जातां जातां तिजशीं बोलण्याचे प्रसंग! बोलणें होतां होतां थट्टामस्करी! आणि थट्टामस्करीचा अतिशय ह्मटला ह्मणजे....! असें हें दुर्व्यसन जडतें. मला तें असेंच जडलें. त्याच्या योगानें पैशाचा क्षय, त्या क्षयाच्या पोटीं लांच खाण्याची चटक, आणि त्या चटकीचा हा परिणाम! माझ्या मित्रांनो, सावध व्हा! सावध व्हा! उगाच भुलूं नका! शिरस्तेदार व इतर कारकून ह्यांनीं फार जपून वा-

गावें. लांचाचा पैसा येतो, तेव्हां बरें वाटतें. शेराची सरी गळ्यांत अडकविली, ह्मणजे त्या प्रसंगीं नंदनवनांतलें सुख कांहींच नाहीं असें होतें! पण मित्रहो, ही सगळी भ्रांति आहे बरें! थोडा विचार करा! मी अशा रंगाच्या भरांत असतां, पुढें प्राप्त होणारी ही दुर्दशा कोणी माझ्या मनांत बिंबेल असें करिता, तर मी तो सर्व सोडून देऊन शुद्धीवर आलों नसतों काय? पण, असें बोलणार कोण? कोणाचें कांहीं अडलें होतें काय? जो कोणी मजपाशीं येई तो मजसारखा होई. इतकेंच केवळ नव्हे; तर मीं ह्मटली ‘एक’, तर त्यानें ह्मणाव्या ‘दोन’! असो. असा माझा दुर्गुण वाढून शेवटीं त्यानें मला बुडविलें. बरें, माझी माती झाली तर झाली; पण मित्रहो, तुह्मी तरी जपून चाला. मित्रहो, कितीही पैसा मिळविला तरी तृप्ति नाहीं, आणि कितीही विषय केला तरी कामशांति नाहीं; असें जर माझ्या आणि मजपेक्षां लक्षपट शाहण्या पुरूषांच्या प्रतीतीस आलें आहे, तर मग उगाच शीण कां करावा? नीतीनें वागावें; जें मिळेल, तें जपून खर्चावें; होईल तितक्या काटकसरीनें संसार करावा, दूरदृष्टि असूं द्यावी; परमेश्वराचें भय धरावें; पाप वर्जावें; पुण्य जोडावें; आणि बरें ह्मणून घेऊन देह सोडावा. तर तें जिणें! नाहीं तर मजसारखीं कुतरीं डुकरें काय थोडीं आहेत?

आतां माझ्या मनांत ह्या देशांतील अंमलदार साहेब लोकांस दोन गोष्टी ऐकवायाच्या आहेत, त्या बोलतों. साहेब बहादूरहो, आपल्यापैकीं पुष्कळ लोकांचे स्वभाव फार सरळ मनें आणि प्रशस्त असतात, ही गोष्ट आपणांस अत्यंत भूषणप्रद आणि आह्मांस मोठी हितावह आहे. आपलीं मनें

जरें वांकडीं, छद्मी, आणि वड्यांचें तेल वांग्यांवर काढणारीं अशीं असतीं, तर आमचे एतद्देशीय लोकांचे पुरे हाल झाले असते. आपलीं मनें अशीं होण्यास कारण विद्येचा प्रसार होय. तसा प्रकार आह्मांमध्यें नाहीं, ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. आह्मी आपले हाताखालचे यःकश्चित् लोक लांच खातों, आणि वाईट रीतीनें वागतों, तेणेंकरूनच लोकांची इतकी दुर्दशा होते; आणि त्यांमध्यें आपलेंही आचरण जर तसेंच असतें, तर ह्या देशांतील रयतेच्या पापास जोडा नव्हता! फार तर काय, पण मुसलमानी राज्याच्या दसपट किंवा शतपट देखील जुलूम झाला असता! परंतु आपण इंग्रज लोक, बहुत करून, तसे नाहींत, ह्मणून आह्मी आपले आणि जगदीश्वराचे शतवार आभार मानितों. मी एतद्देशीय मनुष्य आहें. मी आपल्या देशबांधवांचीं छिद्रें उघड करावीं हें मला योग्य नाहीं, असें कोणी लोक समजतील, तर खुशाल समजोत. त्यांची परवा मी करीत नाहीं. ह्या माझ्या देशबांधवांच्या मर्जीस्तव खऱ्या गोष्टी सांगण्यास म्यां लाजावें, हें मला अगदीं अनुचित दिसतें. ते मला 'कुऱ्हाडीचा दांडा गोहतास काळ' ह्मणतील, तर सुखेनैव ह्मणोत. मी खऱ्या खऱ्या गोष्टी आपणां अधिकारी साहेब लोकांच्या कानांवर घालितों, आणि तेणेंकरून रयतेचीं दुःखें अंशतः तरी कमी व्हावीं, असें इच्छितों. साहेब बहादूरहो, आमच्या देशचे सर्वच लोक वाईट आहेत, असें नाहीं. त्यांमध्यें चांगलेही पुष्कळ आहेत. परंतु सांप्रत काळीं जे सरकारी कामांवर आहेत, त्यांत बरेच लोक सक्त नजर ठेवण्यासारखे आहेत, हें आपण खचीत समजा. आमचे लोक असे कां आहेत, ह्याविषयीं चार गोष्टी मी

आपल्या माहितीप्रमाणें येथें सांगतों. आमचे लोक बहुतक-रून अशिक्षित आहेत; त्यांच्या मनांवर नीतीचा ठसा जसा उठलेला असावा तसा नाहीं; आपणांस मोठ्या जागा कधीं मिळावयाच्या नाहींत, ह्या लहान जाग्यांच्या नौकरीनें पैसा शिल्केस पडावयाचा नाहीं, पैशावांचून निर्वाह चालत नाहीं, आणि कितीही पायांखालीं फुंकून चाललों तरी कोणी कांहीं सोन्याचें कडें हातांत ठोकीत नाहीं; मग काळ चालता आहे, तोंपर्यंत दोन पैसे कां मिळवून ठेवूं नयेत, असें त्यांस वाटतें. आणखी दुसरें एक असें आहे कीं, लांच खाणें हें महापाप आहे, असें फारसें कोणास वाटत नाहीं. ह्याचें कारण असें आहे कीं, ज्या मोठमोठ्या सरकारी कामदारांचीं नांवें आह्मांस माहीत आहेत, आणि ज्यांच्या कित्याप्रमाणें आह्मीं चालावें अशी आमची इच्छा असे, त्यांत निस्पृह आणि लांच न खाण्याविषयीं विख्यात असे पुरुष थोडे. पेशवाईतला मोठा शाहणा सरकारी कामदार ह्मणजे काय तो नाना फडनवीस; त्यास सरकारांतून पगार ह्मटला तर सगळा पंचवीस रुपये दरमहां; ह्मणजे तीनशें रुपये साल होता. पण, तो जीवंत असतां त्याजपाशीं नऊ कोटि रुपये होते, असें सर्व ह्मणतात. हे रुपये आले कोठून? तर लांच खाऊन! जर नाना फडनविसासारख्या शाहण्या आणि विचारी पुरुषानें लांच खाण्यास कमी केलें नाहीं, तर आह्मीच कोण त्याचेपेक्षां मोठे शाहणे आणि पवित्र लागून गेलों आहोंत! असे विचार आमच्या एतद्देशीय लोकांच्या मनांत येतात. हें एक पेशवाईतलें उदाहरण मीं सांगितलें. कारण, तें सर्वत्र प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणें ह्या इंग्रजींतल्या अगदीं लहान पगाराच्या नौकरापासून तों अगदीं मोठ्या पगाराच्या

नौकरापर्यंत लांच खाणाऱ्यांची जर नुसती याद टिपली, तर तीही त्रीच मोठी होईल! साहेबबहादूरहो, आपणांस विदित नाहीं, पण सांप्रत काळीं लांच खाण्याचा बराच सपाटा चालला आहे! महाराज, फार काय सांगावें, जो बिचारा परमेश्वरास भिऊन पैसा खात नाहीं, त्यास इतर कामदार लोक कधीं कधीं अप्रयोजक समजतात! लांच खाणें हें दुर्गुणांच्या यादींतून निघून सद्गुणांच्या मालेंत शिरेल कीं काय ह्याची मोठी भीति पडली आहे! साहेबबहादूरहो, आपल्या हाताखालच्या लोकांनीं लांच खाऊं नये ह्मणून आपण कितीही प्रयत्न केले, तरी हा प्रकार अगदीं बंद होणें फार कठीण आहे; महाराज, आपण केवळ परदेशांतलेच अहां असें नव्हे, तर परखंडांतले अहां; आपली भाषा वेगळी, आमची भाषा वेगळी; आपली रीति वेगळी, आमची रीति वेगळी; आणि आपण आह्मां लोकांत न मिसळतां वेगळे राहतां; ह्यामुळें ह्याचा बंदोबस्त होणें अवघड आहे. कारण, ह्याच्या सगळ्या अंतर्गत भानगडी आपणांस मुळींच कळत नाहींत. आणि जोंपर्यंत आपण अशा परक्यासारखे वागाल, तोंपर्यंत त्या आपणांस कळण्याचा संभव नाहीं. तथापि आपण आपल्या हाताखालच्या लोकांशीं जर प्रेमानें वागाल, तरीही कांहीं अंशीं गोडीच्या पोटीं ह्या प्रकाराचें अंशतः निवारण होणार आहे. ज्या मोठ्या कचेरींत मुख्य अधिकारी निस्पृह एतद्देशीय लोक आहेत तेथें अशा प्रकारें करून पाप होत नाहीं. आपणांपुढें एकादा मोठा खटला आला आणि त्यांत पुष्कळ पुष्कळ मजकुराचे बिकट लिहिलेले असे शेंपन्नास कागद असले, तर ते शब्दशः आ-

पण कधीं वाचितां काय ? नाहीं. कारण, तें काम फार त्रासाचें व फार वेळाचें असतें. बरें, स्वतः जर वाचिले नाहींत, तर त्यांतल्या मतलबाविषयीं शिरस्तेदारावर विश्वास ठेवणें भाग पडतें कीं नाहीं ? बरें, अशा मोठ्या प्रकरणांत बहुतकरून गोबें असतेंच. तेव्हां त्यांत नानाफडनविशी करण्यास शिरस्तेदार सोडील काय ? बरें, अशा कामीं साहेबांनीं तरी काय करावें ? प्रत्येक कागद स्वतः वाचून प्रकरणाचा निकाला करावयाचा असा विचार जर मनांत आणिला तर कलेक्तर साहेबांसारख्यांच्या हातून वर्षांमध्यें एकादें प्रकरण उलगडलें तर मोठें भाग्य! अशानें काम कसें चालेल, आणि रयतेस लवकर न्याय कसा मिळेल ? सांप्रतच्या स्थितीमध्यें दोहोंकडूनही प्रजेची बुडणूक आहे. ह्मणजे पैसा फुकट जातो, आणि अन्याय होतो. आतां ह्यास उपाय नाहीं असें नाहीं. एक उपाय आहे, पण तो बहुकालाचा आणि बहुत श्रमांचा आहे. तो उपाय मिळून हाच कीं, प्रजेनें इंग्रजी भाषा शिकून आणि आपले हक्क काय आहेत हें समजून घेऊन खुद्द साहेब लोकांशीं संबंध ठेवावा, ह्मणजे मजसारख्या लुडबुड्या शिरस्तेदारांचें कांहीं चालणार नाहीं, आणि त्यांच्या पिशव्या भरण्याचें कारण पडणार नाहीं. साहेब लोक आमची भाषा उत्तम शिकून, आह्मांत मिसळून, आमच्या रीतिभाती समजून घेऊन, आणि आमचे कारकुनीचे डावपेंच शिकून जर चांगले तर्बेज होतील, तरीही हा अन्याय नाहींसा होण्यासारखा आहे. पण एवढी मेहनत घेतल्यावांचून साहेबांचें काय अडलें आहे ? ज्याचें पोट दुखेल त्यानें ओंवा खावा. रयतेचें नुकसान होत आहे; त्या अर्थीं तिनें प्रयत्न

करून तें न होई असें करावें, हें तूर्त आवश्यक दिसतें.

साहेब बहादूरहो, आपणांस फसवून शिरस्तेदार आपली चैन करून घेतात किंवा नाहीं, ह्याचीं प्रमाणें पुष्कळ आहेत. तीं सांगण्यास मला आतां अवकाश नाहीं. पण त्यांतलीं दोन दाखवितों तीं पहा. पहिलें प्रमाण हें कीं, तुह्मीं आपल्या शिरस्तेदारास दाहा रुपये पगार अधिक करून, एतद्देशीय अंमलदाराची शिरस्तेदारी करण्यास जातोस का विचारा; तो खुषीनें तर कधींही जावयाचा नाहीं. कारण, तेथें 'जेथल्या बोरी तेथल्याच बाभळी' असल्यामुळें, आपली कांहीं गडबड चालावयाची नाहीं, हें त्याला पक्कें माहीत असतें. स्वतः मीं ऐकिलें नाहीं, पण माझ्या एका मित्राच्या सांगण्यावरून मला असें ठाऊक आहे कीं, एक सेशन जज्ज थट्टेनें एकदां असें ह्मणाला कीं, 'मी जर माझ्या कोर्ताचा शिरस्तेदार होईन, तर हल्लींच्या दुप्पट पैसा मिळवीन'! ही अतिशयोक्ति आहे. तथापि शिरस्तेदारांस पैसे पुष्कळ मिळतात, ही खरी खरी गोष्ट त्या साहेबांस अवगत होती, एवढें त्यांच्या बोलण्यावरून सिद्ध होतें. दुसरें प्रमाण असें कीं, शिरस्तेदार लोक जे व्यसनी नसतात, त्यांजपाशीं पैसा पुष्कळ असतो. मी स्वतः आपली गोष्ट सांगतों.—मला जर हें बाहेर ख्यालीचें व्यसन नसतें, आणि मी जर द्रव्यसंग्रहावर दृष्टि ठेविली असती, तर आज माझे संग्रहीं निदान पंचवीस हजार रुपये रोख असते. माझी गोष्ट असो. आमच्या कचेरींतला जो द्रव्यलोभी शिरस्तेदार मी वर वर्णिला आहे, त्याचे संग्रहीं जितका पैसा होता, तितका आज असिस्तंत कलेक्तराच्या देखील घरांत निघावयाचा नाहीं. मी गप्प सांगत नाहीं. तितका तपास करूं लागल्यास

आज देखील तशीं कांहीं उदाहरणें आढळतील! महाराज, हिंदुस्थानांतले कांहीं लोक आपणांस इतकें फसवितात, असें मनांत आणून उगाच रागास चढूं नका, अथवा खिन्नही होऊं नका. जें खरें खरें आहे, तें मीं आपणांस कळविलें आहे. विचार करा आणि अन्याय कमी होण्याचे उपाय युक्तियुक्तीनें योजा. उगाच भलत्या तजविजी करूं नका.

आतां आमच्या सरकारास उद्देशून दोन शब्द बोलून हें रडगाणें संपवितों. महाराज, मी ह्मणजे मोठा कोणी राज्यें हांकणारा नाना फडनवीस आहें असें नाहीं. मी एका लहानशा कचेरींत गरीबसा कारकून होतों. त्या जागेपासून अनुभव जो मला आला आहे, त्याचा आपण विचार करावा, ह्मणून मी तो आपले कानावर घालतों. साहेब लोकांच्या स्वाऱ्या तालुक्यानिहाय फिरतात, त्यांच्या योगानें देशाचा फायदा कोणता होतो हें मला अद्याप समजलें नाहीं. परंतु, त्यांपासून रयतेस, आणि त्यांतही खेड्यापाड्यांतील गरीब अज्ञान रयतेस अतिशयित त्रास होतो, हें मी खातरीनें सांगतों. मागें पुष्कळ बोललों आहें, पण आणखी एक गोष्ट पुनः आठवली ती उदाहरणार्थ येथें कळविल्यावांचून राहावत नाहीं. अहो, एकादी गरीब गवतवाली असते, तिचा गवताचा भारा आमच्या रावसाहेबांच्या शिपायांनीं आमच्या घोड्यांकरितां घ्यावा, आणि त्या बिचारीच्या हातावर पैसा अधेला टाकून धक्के देऊन तिला घालवावें! तिनें फिर्याद जावें कोणाकडे! तिची दाद घेतो कोण? मुख्य साहेबांकडे दाद लागावी तर त्या बिचाऱ्या खेडुल्या बाया साहेबाला नुसतें पाहूनच तीन

कोश पळणार! मग त्याजपाशीं जाऊन बोलण्याची गोष्ट कशाला पाहिजे! बरें, मामलेदार फौजदार ह्यांजकडे जावें, तर आमचेवर फिर्याद घेण्याची त्यांची काय बिशाद आहे! ह्याप्रमाणें खेड्यांच्या लोकांस जो ताप होतो, त्याचें वर्णन देखील करवत नाहीं. कोणी असें ह्मणतात कीं, देशाच्या बंदोबस्तास ह्या स्वाऱ्या आवश्यक आहेत. त्यांस मी असें विचारतों कीं, एकाद्या तालुक्यांत पांच चार वर्षें किंवा एक दोन वर्षें स्वाऱ्या न गेल्यामुळें, स्वाऱ्या येण्याविषयीं तिकडील लोकांचे कधीं अर्ज आले आहेत काय? नाहींत. ह्यावरून, ह्या स्वाऱ्या बंदोबस्तास आवश्यक नाहींत हें उघड आहे. जमाबंदीच्या संबंधानें पाहिलें असतांही ह्या स्वाऱ्यांचें कारण नाहीं; कां कीं, जमिनीची पाहणी होऊन तिचा सारा ठरला आहे; तो कुळास माहीत आहे; तो कुळकरण्यानें त्याजपासून घ्यावा, आणि तो रीतीप्रमाणें सरकारच्या खजीन्यांत यावा, ही रीत बसली आहे. तींत भानगड होण्याचा संभव नाहीं. बांधबरोळ्याचें काम मामलेदार पाहात आहेतच. त्यांतही साहेब खुद्द असण्याचें कारण नाहीं. इतकेंही असून, गांवचें किंवा तालुक्याचें काम पाहावयाचें असल्यास, तें कागदपत्र आणवून आणि पाटील कुळकरण्यांस बोलावून आणून पाहातां येईल. त्यांतही मोठी कांहीं अडचण नाहीं. सारांश, हल्लींच्या राज्यपद्धतीमध्यें स्वाऱ्यांचें जें प्रकरण आहे, तें केवळ व्यर्थ आहे; त्यापासून गरीब रयतेस ताप होतो, आणि भत्त्याच्या निमित्तानें सरकारच्या खजीन्यासही बरीच मोठी खळगी पडते. ह्या गोष्टीचा आपण अवश्य अवश्य विचार करावा; उपेक्षा करूं नये. 'प्रजेचा संतोष तीच आमच्या

राज्याची मजबुदी,' असें जें कृपाळू राणीसाहेबांच्या जाहीरनाम्यांत आहे, तें अगदीं खरें आहे. आणि ह्या संतोषार्थ ह्या स्वाऱ्या बंद केल्या पाहिजेत. तरी आवश्यक कारण पडेल, तेव्हां अंमलदार साहेबांच्या स्वाऱ्या जिल्ह्यांतून गेल्या पाहिजेत. पण असले प्रसंग थोडे येतात.

महाराज, आतां माझ्या कर्मकथेची समाप्ति होण्याची वेळ आली. जें मला स्वतःच्या अनुभवानें समजलें होतें, तें मीं येथें थोडक्यांत आणि मोघम असें सांगितलें आहे. ह्याचा मुख्य हेतु एवढाच आहे कीं, ह्याच्या योगानें मजसारख्या अविचारी पुरुषांनीं, साहेब अंमलदारांनीं, आणि आमच्या दयाळू इंग्रज सरकारानें सावध व्हावें, आणि आपापलें बरें करून घ्यावें. मीं आपली स्वतःची जी रडकथा सांगितली, ती सर्व शिरस्तेदारांची आहे, असें मी ह्मणत नाहीं. कितीएक शिरस्तेदार परमेश्वराचें भय धरून चालणारे व पाप न करणारे असे आहेत. असे जर सर्व शिरस्तेदार होतील, तर त्यांस खरें सुख प्राप्त होऊन रयतही सुख पावेल. पण जर सगळे असे रामदासस्वामी निघतील, तर ह्या लोकीं अप्रतिष्ठेचा वांटा कोण उचलील ! हीं कारागृहें कोण वसवील ! आणि यमाजीभास्कराकडचीं नरककुंडें कोण भरील !

हरहर ! मित्रहो, सावध व्हा, सावध व्हा ! अरे, द्रव्यलोभाच्या भरीं भरून पापांत पडूं नका ! वास्तविक पाहाल, तर ह्यांत कांहीं अर्थ नाहीं. मित्रहो, पाप करतांना हें पाप आहे असें जें मनांत साहाजिक येतें, त्यास एकीकडे ठेवून भलतेंच करूं नका. एक गोष्ट खचीत लक्षांत ठेवा कीं, पाप कधीं दडत नाहीं; तें कधींना कधीं तरी बाहेर येतें,

आणि त्याचा दंड भोगावा लागतो. थोडा इतिहासाकडे डोळा फिरवा, ह्मणजे तुह्मांला पाहिजेत तितकीं उदाहरणें सांपडतील. स्वतः माझें उदाहरण हें कमी आहे काय? अहो, मला अशी अवस्था प्राप्त होईल, असें माझ्या किंवा माझ्या तोंडपुजांच्या कधीं स्वप्नांत तरी आलें होतें काय? परंतु, पहा आज माझी दशा कशी झाली आहे ती! मित्रहो, एका विद्वान् ग्रंथकाराचें* ह्मणणें असें आहे कीं, "ह्या जगामध्यें साधारणतः सुखापेक्षां दुःख अधिक आहे." आणि तें खरें आहे. अशामध्यें जर आपण आणखी दुःखोत्पादक आचरण केलें, तर अतिशयित दुःख झाल्यावांचून राहील काय? अहो, आधींच कांहीं उत्पन्न नाहीं; डोक्यावर कर्जाचें ढोपलें; आणि त्यांत जर आपण नानाप्रकारचे ढंग करूं लागलों, तर मग भयंकर दुर्दशा कां न व्हावी बरें?

परमेश्वरा, दीनदयाळा, समर्था, प्रभो, तुजपाशीं आतां मागणें मिळून एवढेंच आहे कीं, माझे सर्व अपराध पोटांत घालावे; राहिलेल्या आयुष्यामध्यें माझें चित्त तुजकडे लागावें; त्यां निरंतर तुझें भजन करावें; आणि अजामिळादिकांस जशी त्वां शेवटीं सुगति दिली, तशी मला द्यावी! करुणामूर्ते, मला उपेक्षूं नको. आतां तुजवांचून मला त्राता दुसरा कोणी नाहीं!

आर्या.

देती दुःखचि धन सुत दार सदन आप्त जाति सोडून;
हें प्रथम विचारावें कीं लाभ अशांस काय जोडून.

मोरोपंत.

समाप्त.

---

* डाक्तर जान्सन.